दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २९० | सोमवार ३ ऑगस्ट २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com

## कॉमनवेल्थमध्ये एकाच रात्रीत जिंकली ७ सुवर्णपदके

कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये १ जुलै हा दिवस भारतीय क्रीडा इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरला गेला आहे. भारतीय बॉक्सर्सनी रिंगमध्ये असा काही धुमाकूळ घातला की, अवघ्या ९ तासांच्या अवधीत भारताच्या खात्यात ७ सुवर्ण आणि ३ रौप्य अशी तब्बल १० पदके जमा झाली. बॉक्सिंगच्या मैदानात सर्वाधिक सुवर्ण पदके जिंकून भारत या स्पर्धेत जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनला आहे. या ऐतिहासिक कामगिरीसह भारताने पदकतालिकेत आतापर्यंत १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ८ कांस्य अशा एकूण ३८ पदकांसह चौथ्या स्थानी आहे.भारतासाठी रौप्यपदकांची सुरुवात प्रवीण चित्रवेल याने पुरुषांच्या ट्रिपल जंप स्पर्धेत केली. त्यानंतर बॉक्सिंगमध्ये जादूमणी सिंह याने पुरुषांच्या ५५ किलो गटात रौप्यपदक पटकावले. पॅरा ॲथलेटिक्समध्ये शुभम जुयाल याने शॉटपुट प्रकारात रौप्य जिंकून भारताच्या पदकांमध्ये भर घातली. अनुभवी बॉक्सर लव्हलिना बोर्गोहेन हिने महिला ७५ किलो गटात रौप्यपदक मिळवले. दिवसातील शेवटच्या बॉक्सिंग अंतिम सामन्यात नरेंदर बेरवाल यालाही रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. दरम्यान, जूडोमध्ये उन्नती शर्मा हिने कांस्यपदक जिंकून भारताच्या पदकसंख्येत आणखी भर घातली. भारतासाठी दिवसातील शेवटचे सुवर्णपदक अंकुश पंघाल याने जिंकले.

## मुळा धरण साठा ७६ टक्क्यांवर! शेतकऱ्यांमध्ये आनंद वातावरण

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्याला वरदान ठरलेले मुळा धरण ७६ टक्क्यांच्या पुढे गेल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

जून महिन्यात पावसाने दडी मारल्यामुळे मुळा धरणाची पातळी अतिशय खालावली होती राहुरी शहराला सुद्धा पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे मुळा धरणावर अवलंबून असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह नागरिकांचे डोळे आभाळाकडे लागले होते. परंतु निसर्गाने कृपा केली व जुलै महिन्यात पावसाने मुळा धरणाच्या लाभक्षेत्रात उत्तम प्रकारे हजेरी लावल्याने धरणात मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली व आज धरणाचा साठा ७६ टक्के झाला असून दुपारी तीन वाजता मुळा धरणात १९,७२० टीएमसी पाण्याचा साठा झाल्याने मुळा धरणावर



अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

दुपारी दुपारी तीन वाजता कोतुळ कडून मुळा धरणाकडे ११,५८७ क्युसेस वेगाने पाणी सुरू होते. लाभक्षेत्रात पावसाचे प्रमाण जर असेच राहिले व धरणात येणारी पाण्याची आवक जर अशीच सुरू राहिली तर तांत्रिकदृष्ट्या धरण लवकरच भरू शकते अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

त्यामुळे मळा धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यातून शेतकऱ्यांसाठी खरीप रब्बी हंगामासाठी पाणी सोडले जाऊ शकते. धरणाची पातळी वाढल्यानंतर मुळा नदीत सुद्धा पाण्याचा विसर्ग सोडला जाऊ शकतो. एकंदरीत मुळा धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

त्यामुळे जलसंपदा विभाग व शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# धर्मांतरविरोधी कायद्यावर राष्ट्रपतींची मोहोर

■ महाराष्ट्रात 'धर्मस्वातंत्र्य कायदा-२०२६' लागू
■ बळजबरी, फसवणूक व आमिषाने धर्मांतर अजामीनपात्र गुन्हा; ७ वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यात बळजबरी, फसवणूक, धमकी, अवाजवी प्रभाव, आमिष किंवा विवाहाच्या माध्यमातून होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतराला आळा घालण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६' ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिल्यानंतर हा कायदा राज्यात लागू झाला आहे. अधिकृत राजपत्रात (गॅझेट) ३० जुलै रोजी अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली असल्याची माहिती राज्य सरकारच्या सूत्रांनी दिली.

मार्च महिन्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य विधिमंडळाने हे विधेयक मंजूर केले होते. त्यानंतर राज्यपालांच्या शिफारशीनंतर ते राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. आता राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर राज्यात बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांवर नव्या कायद्यानुसार कठोर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

### 'वंचित' न्यायालयात आव्हान देणार

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी या कायद्याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याची घोषणा केली आहे. हा कायदा संविधानातील मूलभूत अधिकारांशी विसंगत असल्याचा दावा करत त्यांनी न्यायालयीन लढाई लढण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे या कायद्यावर राजकीय आणि कायदेशीर वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.



धर्मांतराच्या प्रकरणांवर नव्या कायद्यानुसार कठोर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

या कायद्यानुसार बळजबरीने, फसवणूक करून, धमकी देऊन किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणे हा अजामीनपात्र गुन्हा ठरणार असून दोषी आढळल्यास सात वर्षांपर्यंत कठोर कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. पुनरावृत्ती झाल्यास शिक्षेची कमाल मर्यादा दहा वर्षांपर्यंत वाढविण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच स्वेच्छेने धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला ६० दिवस अगोदर सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

विधानसभेतील चर्चेदरम्यान काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), समाजवादी पक्ष आणि सीपीआय (एम) यांनी या विधेयकाला विरोध केला होता. हा कायदा घटनाबाह्य असून **(पान ४ वर)**

### कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी

- बळजबरी, धमकी, फसवणूक, आमिष किंवा अवाजवी प्रभावाद्वारे धर्मांतर गुन्हा.
- गुन्हा अजामीनपात्र; सात वर्षांपर्यंत कठोर कारावासाची शिक्षा.
- पुनरावृत्ती झाल्यास दहा वर्षांपर्यंत कारावास.
- एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद.
- स्वेच्छेने धर्मांतरासाठी ६० दिवस आधी सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज आवश्यक.
- धर्मांतरित व्यक्तीचे पालक व निकटवर्तीयांनाही तक्रार दाखल करण्याचा अधिकार.
- बेकायदेशीर धर्मांतरास मदत किंवा प्रोत्साहन देणाऱ्यांवरही कारवाईची तरतूद.
- देशातील किमान १२ राज्यांमध्ये यापूर्वीच अशा प्रकारचे धर्मांतरविरोधी कायदे लागू आहेत.

## महिलांच्या गोंधळाने गाजली शिक्षक बँकेची सभा

### नऊ वर्षांची शांततेत सभेची परंपरा खंडित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** दरवर्षी नेहमी चर्चेत असणारी मात्र गेली नऊ वर्ष शांततेत दीर्घकाळ चालणारी शिक्षक बँकेची वार्षिक सभा यावर्षी मात्र महिला शिक्षकांनी घातलेल्या गोंधळाने गाजली. महिला शिक्षिकांनी माइकची ओढाताण करून तसेच एकमेकीवर हातवारे करून अशलाघ्य भाषेचा वापर करीत महिला सुद्धा वार्षिक सभेत गोंधळ घालण्यात कमी नाही याची प्रचिती दिली.

२५ वर्षानंतर शिक्षक बँकेत सरस्वती घुले यांच्या रूपाने महिला संचालिकेला अध्यक्षपदाची संधी देण्यात आली. त्यांच्या अध्यक्षतेखाली आज अहिल्यानगर जिल्हा शिक्षक बँकेची १०७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. महिला अध्यक्ष असल्याने यावर्षी मोठ्या संख्येने महिला सभासद देखील प्रथमच उपस्थित होत्या. महिलांना प्रथम बोलण्याची संधी सभेच्या अध्यक्षा घुले यांनी दिली.

मनोगत व्यक्त करण्यासाठी पहिले नाव गुरुमाऊली सदिच्छा महिला आघाडीच्या






अध्यक्ष कांता बनकर यांचे पुकारण्यात आले . त्या बोलत असताना खाली बसलेल्या विरोधी आघाडीच्या महिला सदस्या स्वाती गोरे व इतरांनी त्यांच्या भाषणात अडथळे निर्माण केले. त्यामुळे चिडून कांता बनकर यांनी तुम्ही चिमूटभर महिला काय करणार? असा शब्द उच्चारला. चिमूटभर या शब्दाचा आधार घेत विरोधकांनी प्रचंड गोंधळ केला, घोषणा बाजी केली. स्वाती गोरे व इतर महिला व्यासपीठावर चढल्या. त्यांनी कांता बनकर यांच्याकडून माईक ओढून घेतला तसेच डायस लोटून दिले. त्यांचे हे अनपेक्षित रूप पाहून सभागृह अवाक झाले. याच दरम्यान हा गोंधळ सहन न झाल्याने गुरुमाऊली महिला आघाडीच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षी अवचरे यांना भोवळ आली. त्यांना तातडीने दवाखान्यात नेण्यात आले. इसीजी काढण्यात आला. मात्र तो नॉर्मल आल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. नंतर त्या पुन्हा सभागृहात येऊन बसल्या. **(पान ४ वर)**

### सर्वसाधारण सभेतील मंजूर विषय

जामीन कर्ज १ चा व्याज दर ८.२५ % केला
शैक्षणिक कर्ज, वाहन कर्ज,गृहकर्ज या सर्व कर्जाचा व्याज दर ७% केला
NPS बंधू भगिनी यांना कुटुंब आधार योजनेतून २१ लाख देणार
भा. द. पाटील आणि दोंदे पारितोषिक रकमेत दुप्पट वाढ करणार
कर्ज मर्यादा ५ लाख रुपये वाढवणार
राज्य कार्यक्षेत्र विषय स्थगित करून त्यासाठी दिवाळीनंतर विशेष सभा घेणार
मयत कर्ज निवारण निधी ची ७५० रु कपात बंद करण्याचा निर्णय

## भरधाव स्कॉर्पिओने स्कुटीला २०० फूट फरफटले, विद्यार्थिनीचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** कोल्हार-घोटी राज्य महामार्गावरील सातवा मैल फाटा परिसरात भरधाव वेगाने आलेल्या स्कॉर्पिओनेइलेक्ट्रिक स्कुटीला समोरून जोराची धडक दिली असता झालेल्या भीषण अपघातात आरुषी अनिल कर्पे वय १६, रा. पिंपळगाव कौंझौरा, ता. संगमनेर) हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. संगमनेर तालुक्यातील पिंपळगाव कोझिरा येथील रहिवासी असणारी आरुषी कर्पे ही आपल्या इलेक्ट्रिक स्कुटीवरून सालवा मैल फाटा येथून शाळेच्या क्लाससाठी संगमनेरकडे जात होती. त्याचवेळी संगमनेरच्या दिशेने भरधाव वेगाने येत असणारी स्कार्पिओ गाडी नंबर एमएच-१० डीव्ही-३४४७ हिच्या वरील चालक हेमंत बाळासाहेब गीते रा. वडाळा महादेव तालुका श्रीरामपूर याने सातवा मैल येथील स्पीड ब्रेकर आणि रहदारीचे ठिकाण असूनही वेग कमी न करता निष्काळजीपणे वाहन चालवत स्कुटीला समोरून जोराची धडक दिली धडकेनंतर स्कॉर्पिओने स्कुटीसह आरुषीला सुमारे २०० फूटांपर्यंत फरफटत नेत गंभीर रीत्या जखमी केले. या भीषण अपघातात तिचा मृत्यू झाला



या दुर्दैवी घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे

या प्रकरणी मयत आरुषीचे चुलते भागवत पाटील भाऊ कर्पे यांनी संगमनेर तालुका पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून तालुका पोलिसांनी स्कार्पिओ चालक हेमंत बाळासाहेब गीते (वय ३१, रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे अधिक तपास संगमनेर तालुका पोलीस करत आहे याबाबतचा अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक विकास काळे हे करत आहे.

## राज्यातील पाणीसाठा ६८.८७ टक्क्यांवर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे राज्यातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली आहे. गेल्या आठ दिवसांतच धरणसाठ्यात तब्बल १५२ टीएमसी पाण्याची भर पडली असून, जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील ३,०२९ प्रकल्पांमध्ये ९७९.४० टीएमसी म्हणजेच ६८.८७ टक्के पाणीसाठा झाला आहे. पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाल्याने राज्यातील ४९ धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

गेल्या वर्षी याच कालावधीत राज्यातील धरणांमध्ये ७१.१५ टक्के पाणीसाठा होता. त्या तुलनेत यंदाचा साठा सुमारे २.३ टक्क्यांनी कमी आहे. मात्र, पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणांतील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यंदा ३१ मेअखेर राज्यातील धरणांमध्ये केवळ ३९५ टीएमसी म्हणजे सरासरी २७ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. त्यामुळे पावसाळ्यात चांगल्या पावसाची आवश्यकता होती. जूनमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्याने धरणांमध्ये पाणीसाठा वाढला नाही. मात्र, जुलैच्या सुरुवातीपासून ९ जुलैपर्यंत राज्यातील अनेक भागांत दमदार पाऊस झाला. त्यानंतर काही काळ पावसाने उघडीप दिली. २० जुलैनंतर पुन्हा विविध भागांत मुसळधार पाऊस झाल्याने धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी दाखल झाले.गेल्या महिनाभरात धरणांमध्ये ५८४.३९ टीएमसी पाण्याची आवक झाली आहे. त्यामुळे अनेक धरणांतील पाणीसाठा ५० टक्क्यांहून अधिक झाला असून, काही धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. कोकण, घाटमाथा, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत झालेल्या पावसामुळे ओढे, नाले आणि नद्यांना पूर आला. त्याचा थेट परिणाम धरणांतील पाण्याच्या आवकेत झाला आहे.कोकणातील बहुतांश धरणांमध्ये पाणीसाठा ७५ टक्क्यांहून अधिक झाला आहे. भातसा धरणातून ७,८२१ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू असून, अप्पर वैतरणा, सूर्या आणि धामणी **(पान ४ वर)**

## खोटा गुन्हा मागे घेण्यासाठी १० लाखांची खंडणी

### विरोध केल्याने लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला

**श्रीगोंदा :** खोटा बलात्कार व ॲट्रॉसिटीचा गुन्हा मागे घेण्यासाठी १० लाख रुपयांची खंडणी मागितली, पैसे देण्यास नकार दिल्यानंतर रस्ता अडवून लोखंडी रॉड व लाकडी काठ्यांनी जीवघेणा हल्ला करत १२ हजार रुपयांची रोकड लुटल्याचा धक्कादायक प्रकार श्रीगोंदा तालुक्यातील सुरेगाव फाट्यानजीक घडला आहे. या प्रकरणी गणेश भिवसेन झेंडे, महेश भिवसेन झेंडे, कविता गणेश झेंडे (रा. चिखली) व विशाल राठोड यांच्याविरुद्ध बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की , धनश्याम संभाजी झेंडे ( रा. चिखली) हे २८ जुलै रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास

### चिखलीतील चौघांविरुद्ध गुन्हा

चार्जिंग मोटारसायकलवरून कोळगावकडे जात असताना सुरेगाव फाट्याजवळ आरोपींनी किया सेल्टॉस कार आडवी लावून त्यांना अडवले.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, गणेश भिवसेन झेंडे याने, तुझ्यावर आणि तुझ्या साथीदारांवर माझ्या सांगण्यावरून खोटा बलात्कार व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. तो मागे घ्यायचा असेल तर १० लाख रुपये द्या, अशी मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर महेश भिवसेन झेंडे याने फिर्यादीच्या शर्टाच्या खिशातून १२ हजार रुपये काढून घेतले, तर गणेश झेंडे याने लोखंडी रॉडने डोक्यावर व हातावर वार केले. कविता गणेश झेंडे आणि विशाल राठोड यांनी लाकडी काठ्यांनी हात-पायावर मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या धनश्याम झेंडे यांच्यावर अहिल्यानगर येथील विघ्नहर्ता हॉस्पिटल मध्ये उपचार करण्यात आले.

रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांची गर्दी होऊ लागल्याने आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. फिर्यादीने यापूर्वी चिखली गावठाणातील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईवेळी उपस्थित राहिल्याचा राग मनात धरून आरोपींनी हा कट रचल्याचा आरोपही तक्रारीत केला आहे.

या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक तपास बेलवंडी पोलीस करीत आहेत.

## रिपब्लिकन नेते अशोक गायकवाड यांचे निधन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचे नेते अशोक गायकवाड (वय ७२) यांचे रविवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी (दि.३) दुपारी १२ वाजता नगरच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सोमवारी सकाळी झोपडी कॅन्टीन जवळील लॉईड बिशप कॉलनी येथील त्यांच्या राहत्या घरापासून अंतयात्रा निघणार आहे.



शनिवारी ते श्रीरामपूरमध्ये पक्षाच्या कामासाठी गेले होते. तेथे त्यांना त्रास होऊ लागला. त्यांना नगरला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना ब्रेन हॅमरेज झाले होते. त्यात त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

स्वर्गीय अशोकराव गायकवाड हे वयाच्या २० व्या वर्षापासून आंबेडकरी चळवळीशी जोडले गेले होते. सुरुवातीला त्यांनी दलित पँथर या संघटनेच्या माध्यमातून कामाला सुरुवात केली. १० वर्ष ते जिल्हा परिषदेचे सदस्य होते. तसेच मुळा सहकारी साखर कारखान्याचे ते संचालक ही होते. आंबेडकरी चळवळीतील संघर्षशील नेते म्हणून त्यांची जिल्ह्यात ख्याती होती. बहुजन क्रांती मोर्चामध्ये त्यांचा सहभाग होता. त्याचबरोबर मराठवाडा विद्यापीठ नामांतरासाठी झालेल्या संघर्षामध्ये स्वर्गीय अशोकराव गायकवाड हे अग्रभागी होते. नगरमध्ये झालेल्या साहित्य संमेलनाच्या वेळी शिवसेना आणि आरपीआय कार्यकर्त्यांमध्ये जोरदार घोषणाबाजी होऊन मोठा वाद निर्माण झाला होता. यावेळी पोलिसांनी शिवसेना आणि आरबीआयच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले होते. त्यात अग्रभागी आरपीआयचे प्रमुख ना.रामदास आठवले यांच्याबरोबर स्वर्गीय अशोक गायकवाड यांनाही तुरुंगात बसावे लागले होते. त्याचबरोबर शिवसेनेचे **(पान ४ वर)**

# धर्मांतरविरोधी कायदा : संविधानाच्या कसोटीवरील नवी परीक्षा..!

**बळजबरीला लगाम घालण्याच्या उद्देशाने आणलेला कायदा नागरिकांच्या धर्मस्वातंत्र्यालाही स्पर्श करतो; त्यामुळे त्याची खरी परीक्षा न्यायालयात आणि अंमलबजावणीतच होणार आहे.**

-----------------------

महाराष्ट्रात 'धर्मस्वातंत्र्य कायदा-२०२६' लागू झाल्यानंतर राज्यातील राजकारण, समाजकारण आणि न्यायव्यवस्था या तिन्ही क्षेत्रांमध्ये नव्या वादाला तोंड फुटले आहे. बळजबरी, फसवणूक, धमकी, आमिष किंवा विवाहाच्या माध्यमातून होणाऱ्या धर्मांतराला प्रतिबंध घालण्यासाठी राज्य सरकारने हा कायदा आणल्याचा दावा केला आहे. मात्र, विरोधकांच्या मते हा कायदा धर्मस्वातंत्र्य, गोपनीयता आणि वैयक्तिक निवडीच्या घटनात्मक अधिकारांवर गदा आणणारा आहे. त्यामुळे या कायद्याची चर्चा केवळ कायदेशीर तरतुदींपुरती मर्यादित न ठेवता भारतीय संविधान, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेच्या व्यापक चौकटीतून होणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानाचे कलम २५ प्रत्येक नागरिकाला विवेकस्वातंत्र्य, धर्म स्वीकारण्याचा, आचरण करण्याचा आणि प्रसार करण्याचा अधिकार देते. हा अधिकार अमर्यादित नाही; तो सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्याच्या अधीन आहे. याच तत्त्वावर अनेक राज्यांनी धर्मांतरविरोधी कायदे केले. महाराष्ट्र हा अशा कायद्याची अंमलबजावणी करणारा बारावा राज्य ठरला आहे. ओडिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, झारखंड, हरियाणा, कर्नाटक, अरुणाचल प्रदेश अशा अनेक राज्यांमध्ये यापूर्वीच अशा प्रकारचे कायदे अस्तित्वात आहेत. मात्र या कायद्यांच्या अंमलबजावणीवर आणि त्यांच्या परिणामांवर सातत्याने वाद होत आले आहेत.

राज्य सरकारचा युक्तिवाद स्पष्ट आहे. स्वेच्छेने धर्म




स्वीकारणाऱ्यांवर कोणतेही निर्बंध नसून केवळ फसवणूक, आर्थिक आमिष, मानसिक दबाव किंवा संघटित पद्धतीने होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतराला आळा घालणे हा उद्देश आहे. जर अशा घटना घडत असतील, तर त्यांना रोखण्यासाठी प्रभावी कायदेशीर चौकट असणे आवश्यक आहे. विशेषतः सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना फसवून धर्मांतर घडवून आणले जात असेल, तर शासनाने हस्तक्षेप करणे ही त्याची जबाबदारीच आहे.

परंतु, चांगला हेतू आणि योग्य परिणाम यांच्यात नेहमीच समानता असते असे नाही. अनेकदा कठोर कायद्यांचा वापर मूळ उद्देशापेक्षा वेगळ्या कारणांसाठी झाल्याची उदाहरणे देशाने पाहिली आहेत. धर्मांतरापूर्वी ६० दिवसांची पूर्वसूचना, नातेवाईकांना तक्रार करण्याचा अधिकार, अजामीनपात्र गुन्ह्याची तरतूद आणि कठोर शिक्षा यामुळे प्रशासनाला मोठे अधिकार मिळतात. या अधिकारांचा वापर निष्पक्षपणे झाला तर कायदा प्रभावी ठरेल; परंतु त्यांचा गैरवापर झाला तर वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा येण्याची भीती नाकारता येत नाही.

याच कारणामुळे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), समाजवादी पक्ष, डावे पक्ष आणि अनेक नागरी हक्क संघटनांनी या कायद्याला विरोध केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही हा कायदा उच्च न्यायालयात आव्हान देण्याची घोषणा केली आहे. त्यांचा दावा आहे की धर्म स्वीकारणे किंवा बदलणे हा व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे आणि शासनाची पूर्वसूचना अनिवार्य करणे हे गोपनीयतेच्या अधिकाराशी विसंगत ठरू शकते.

सर्वोच्च न्यायालयाने विविध निर्णयांमध्ये बळजबरी, फसवणूक किंवा आमिषाद्वारे धर्मांतर रोखण्यासाठी राज्यांना कायदा करण्याचा अधिकार मान्य केला आहे. त्याचवेळी न्यायालयाने हेही स्पष्ट केले आहे की, प्रत्येक व्यक्तीचे विवेकस्वातंत्र्य आणि वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे. त्यामुळे न्यायालयीन तपासणीमध्ये या कायद्याच्या तरतुदी संविधानाच्या कसोटीवर टिकतात का, हा महत्त्वाचा प्रश्न ठरणार आहे.

भारताचा सामाजिक इतिहास पाहिला तर धर्मांतरामागे अनेक कारणे दिसून येतात. काहींनी वैयक्तिक श्रद्धेमुळे धर्म बदलला, तर अनेकांनी सामाजिक अन्याय, जातीय भेदभाव, अस्पृश्यता किंवा मानवी सन्मानाच्या शोधात धर्मांतर स्वीकारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बौद्ध धर्म स्वीकारणे ही भारतीय सामाजिक परिवर्तनाची ऐतिहासिक घटना आहे. त्यामुळे प्रत्येक धर्मांतर संशयास्पद आहे, अशी भूमिका जितकी चुकीची आहे, तितकीच प्रत्येक धर्मांतर पूर्णपणे स्वेच्छेनेच होते, असे मानणेही वास्तवाशी सुसंगत नाही.

यामुळेच या कायद्याचे मूल्यमापन भावनेवर नव्हे, तर तथ्यांवर झाले पाहिजे. कायद्यामुळे बळजबरीने होणारे धर्मांतर खरोखर कमी होते का? निरपराध नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल होतात का? प्रशासन निष्पक्ष राहते का? न्यायालये नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करतात का? या प्रश्नांची उत्तरेच या कायद्याचे यश किंवा अपयश निश्चित करतील.

कायदा हा समाजात भीती निर्माण करण्यासाठी नसतो; तो न्याय, स्वातंत्र्य आणि समानता यांचे संरक्षण करण्यासाठी असतो. धर्मांतरविरोधी कायद्याचाही अंतिम उद्देश हाच असला पाहिजे. बळजबरी, फसवणूक आणि आमिषाला कठोर आळा बसलाच पाहिजे; परंतु त्याच वेळी नागरिकाच्या अंतरात्म्याच्या स्वातंत्र्यावर राज्यसत्तेची सावली पडू नये. संविधानाने नागरिकाला धर्म निवडण्याचा अधिकार दिला आहे आणि राज्याला त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी. या दोन मूल्यांमधील समतोल बिघडला, तर कायद्याचा विजय होईल; पण लोकशाही हरू शकते. त्यामुळे 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा-२०२६'ची खरी परीक्षा न्यायालयाच्या निकालात नव्हे, तर त्याच्या निष्पक्ष, संयमी आणि संविधाननिष्ठ अंमलबजावणीतच दडलेली आहे.

# तेलकुडगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील तेलकुडगाव येथे लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना प्रमख मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. नेवासा नगरपंचायतचे नगरसेवक प्रवीण आप्पा सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तेलकुडगाव आणि अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, कंपास, खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी सतिशराव काळे पाटील व मुख्याध्यापक बोरूडे यांनी मनोगतातून या दोन महापुरुषांची महती सांगितली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील एक महान समाजसुधारक, लोकशाहीर आणि प्रसिद्ध साहित्यिक होते. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला असून १८ जुलै १९६९ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांनी मराठी साहित्यात ३५ कादंबऱ्या, १५ कथासंग्रह आणि अनेक पोवाडे लिहून वंचितांच्या वेदनांना प्रभावीपणे वाचा फोडली. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी साता समुद्रापार रशियामध्ये रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरती पोवाडा गायला. प्रमुख मान्यवरांनी आपल्या मनोगतातून या महापुरुषांच्या जिवनचरित्राचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अंबादास बोरुडे, सतिशराव काळे पाटील मा. सरपंच, चंद्रकांत देवढे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




### श्रीरामपुरात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' संपन्न विविध योजनांच्या लाभाचे वितरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र शासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या ''छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'' अभियानांतर्गत श्रीरामपूर येथे एका विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या लोकाभिमुख शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला या शिबिरामध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी आणि वैयक्तिक लाभ योजनांचे मंजुरीपत्र पात्र लाभार्थ्यांना सन्मानपूर्वक वितरित करण्यात आले. प्रशासकीय यंत्रणा थेट लोकांपर्यंत नेऊन त्यांच्या अडीअडचणी व समस्या जागेवरच सोडविण्याचा हा उपक्रम सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक ठरला आहे. शासन आणि प्रशासनाच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत आणि प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचल्यास खऱ्या अर्थाने विकासाला गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. पात्र नागरिकांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.या शिबिरास प्रशासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते, आमदार हेंमत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, प्रांताधिकारी किरण सावंत, तलसीलदार मिलिंद वाघ, बाबासाहेब दिघे,अमित पवार, विवेक शिर्के, यावेळी आदी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# नव स्वराज्य सेनेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नव स्वराज्य सेनेच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना नव स्वराज्य सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विजयराव खाजेकर म्हणाले की, ''पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती श्रमिकांच्या हातावर तरलेली आहे,'' हा अण्णाभाऊ साठे यांचा विचार श्रमाचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. तसेच ''जग बदल घालुनी घाव, सांगून गेले भीमराव'' या ओळींमधून त्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांना अभिवादन केले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समता, सामाजिक न्याय आणि मानवमुक्तीचे विचार आत्मसात करून आपल्या साहित्याद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य केले.

यावेळी दशरथ भोंगळे, संपतराव मोरे, अनिल सावंत, मयुरी जगधने, जसपाल सिंग सहानी, योगेश ससाने, नितीन क्षीरसागर, दीपक भांड यांच्यासह नव स्वराज्य सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मध्यरात्री दूधवाहू वाहनातून शेतकऱ्याच्या घरी पोहोचले : आ. अमोल खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** | तालुक्यातील पेमगिरी येथील डाळिंब उत्पादक शेतकरी सोमनाथ किसन गोडसे यांच्या नुकसानग्रस्त बागेची पाहणी करण्यासाठी आमदार अमोल खताळ यांनी रविवारी मध्यरात्री थेट त्यांच्या घरी भेट दिली. खराब रस्त्यामुळे शेवटचा टप्पा दूधवाहू वाहनातून पार करत त्यांनी शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचून नुकसानीची माहिती घेतली.

सोमनाथ गोडसे यांनी दोन एकर डाळिंब बागेवर रासायनिक औषधाची फवारणी केली होती. मात्र चार ते पाच दिवसांत झाडांची पाने जळून गेली आणि संपूर्ण बागेचे मोठे नुकसान झाले. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरल्याने गोडसे कुटुंब आर्थिक व मानसिक संकटात सापडले.

या घटनेची माहिती मिळताच आमदार खताळ यांनी रात्री उशिरा पेमगिरी गाठले. गोडसे यांचे घर गावापासून सुमारे चार ते पाच किलोमीटर अंतरावरील मळ्यात असल्याने रस्ता अत्यंत खराब होता. तरीही त्यांनी दूधवाहू वाहनाच्या मदतीने शेतकऱ्याच्या घरी जाऊन नुकसानग्रस्त बागेची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून तातडीने पंचनामा करण्याच्या तसेच शासनाच्या नियमांनुसार शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडे स्वतः पाठपुरावा करणार असून शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नसल्याची ग्वाहीही आमदार खताळ यांनी दिली.

## श्री रेणुका आश्रम ते माहुरगड पदयात्रेचे नेवासेनगरीत स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील मौनयोगी सदगुरू श्री रेवणनाथ महाराज यांच्या प्रेरणेने श्री रेणुका आश्रम ते माहुरगड या पदयात्रेचे नेवासेनगरीत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.पायी पदयात्रेचे हे रौप्य महोत्सवी २५ वे वर्ष आहे. दि.३१ जुलै निघालेली ही माहुरगड



पदयात्रा दि.१६ ऑगस्ट रोजी माहुरगड येथे पोहचणार आहे.रेणुका आश्रमाचे प्रमुख ॲड. आदिनाथ जोशी व सौ.आदिती जोशी हे या पदयात्रेचे नेतृत्व करत आहे.

पदयात्रेच्या तिसऱ्या दिवशी संत ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी नेवासेनगरीत पायी पदयात्रा दिंडीचे आगमन झाले असता येथील श्री खोलेश्वर गणपती मंदिर चौकात
नेवासेकरांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी पदयात्रा दिंडी चालक अँड.आदिनाथ जोशी यांचा पुरातन म्हाळसा खंडोबा देवस्थान जीर्णोद्धार कमिटीचे अध्यक्ष संभाजी ठाणगे व राजेंद्र काशीद,राजेंद्र थावरे,वृक्ष मित्र अमृत फिरोदिया यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## चिंचोलीच्या कॉलेज ऑफ फार्मसीच्या पाच विद्यार्थिनींची ऑफिसरपदी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सिंधू छाया कॅम्पस, चिंचोली (सिन्नर) येथील कॉलेज ऑफ फार्मसी (फॉर वुमेन) मधील अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या पाच विद्यार्थिनींनी प्लेसमेंट प्रक्रियेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील प्रियंका गायकवाड, प्रतिभा आडके, श्रेया मेंडोळे, विशाखा पाटील आणि वैष्णवी शिरसाठ यांची नामांकित औषधनिर्मिती कंपनी इप्का लॅब लिमिटेड, इंदूर येथे क्वालिटी कंट्रोल (टउ) ऑफिसर पदासाठी निवड झाली आहे. अशी माहीती प्राचार्या डॉ.चारुशिला भंगाळे यांनी दिली. महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागामार्फत विद्यार्थिनींना औषधनिर्माण उद्योगाच्या गरजांनुसार सातत्याने उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये तांत्रिक कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत तयारी, संवादकौशल्य, ॲप्टिट्यूड तसेच रोजगाराभिमुख प्रशिक्षणाचा समावेश आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थिनींना देशातील नामांकित औषधनिर्मिती कंपन्यांमध्ये करिअरच्या उत्तम संधी उपलब्ध होत आहेत. या यशामागे महाविद्यालयाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. राहुल सोनटक्के,प्रा. व्ही. डी. कुंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींना सातत्याने प्रोत्साहन व मार्गदर्शन केले.

## उधारीवर बिडी न मिळाल्याने ११२ वर खोटा कॉल; तरुणाविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : -उधारीवर बिडीचा पुडा न दिल्याचा राग एका तरुणाला इतका अनावर झाला की, त्याने थेट पोलिसांच्या ११२ आपत्कालीन हेल्पलाईनवर खोटा कॉल करून दुकानदाराला अडकवण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या तपासात त्याचा बनाव उघडकीस आला आणि आता त्याच्यावरच गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना कोपरगाव तालुक्यातील शिरसगाव येथे घडली. सावळगाव येथील सागर छगन भागवत याने शुक्रवार (दि.३१) रोजी ११२ वर फोन करून शिरसगाव बस स्थानकासमोरील प्रियंका जनरल स्टोअर्स या दुकानात गुटखा विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना दिली.माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पंचांच्या उपस्थितीत दुकानाची झडती घेतली. मात्र दुकानात गुटखा किंवा कोणताही प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ आढळून आला नाही. त्यामुळे पोलिसांना संशय आल्याने कॉल करणाऱ्या सागर भागवत याची चौकशी करण्यात आली. सखोल चौकशीत धक्कादायक बाब समोर आली. प्रियंका जनरल स्टोअर्समधून उधारीवर बिडीचा पुडा न दिल्याच्या रागातून दुकानदाराला त्रास देण्यासाठीच सागर भागवत याने खोटी माहिती देत११२ वर कॉल केल्याची कबुली दिली.या प्रकरणी सागर छगन भागवत याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २१७ अन्वये अदखलपात्र गुन्हा क्रमांक ६३९/२०२६ कोपरगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस कॉन्स्टेबल युवराज खुळे यांनी स्वतः फिर्याद दिली असून, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करीत आहे. आपत्कालीन सेवेचा गैरवापर करू नका, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असा स्पष्ट इशारा या घटनेतून पोलिसांनी दिला आहे.

## २७ वर्षांच्या सेवेनंतर अल्प अनुदानावर मुख्याध्यापक दत्तात्रय कोळेकर सेवानिवृत्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील पिचडगाव येथील सुदर्शन इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक दत्तात्रय कोळेकर हे तब्बल २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. विशेष म्हणजे, या दीर्घ सेवाकाळात त्यांना केवळ अखेरच्या तीन वर्षांसाठी २० टक्के मानधनरूपी अनुदान मिळाले. त्यांच्या ज्ञानदानातील योगदानाचा गौरव सेवापूर्ती समारंभात करण्यात आला. कार्यक्रमात शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामदासजी गोल्हार यांच्या हस्ते दत्तात्रय कोळेकर व त्यांच्या पत्नी कल्पनाताई कोळेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना गोल्हार यांनी, शिक्षकच भावी पिढी घडविण्याचे पवित्र कार्य करतात, असे सांगत कोळेकर यांच्या संघर्षमय सेवेला सलाम केला. तसेच पिचडगाव येथे संस्थेने दोन एकर जागा घेतली असून, तेथे शाळेची सुसज्ज इमारत उभारून ज्युनिअर कॉलेज सुरू करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

मुख्याध्यापक शकूर इनामदार यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेताना अनेक माजी विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, वकील, पोलीस, सैन्यदल आणि उद्योजक म्हणून कार्यरत असल्याचे सांगितले. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमात माऊली आश्रमाचे गुरुवर्य ज्ञानेश्वर हजारे, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीपराव सरोदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले, तर प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती धनादेशांचेही वितरण करण्यात आले.



## वाकडीत संताप ! अण्णाभाऊ साठे जयंतीस पदाधिकारी उपस्थित नसल्याने नागरिक आक्रमक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी** राहाता तालुक्यातील वाकडी ग्रामपंचायतीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंतीनिमित्त सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित न राहिल्याने व उशिरा ग्रामपंचायत कार्यालयात जयंती साजरी केल्याने पदाधिकाऱ्याविरुद्ध तीव्र संतापाची लाट उसळली आहेत.अण्णाभाऊ साठे नगर व वसाहत, गावठाण मधील समाज बांधव व काही ग्रामस्थ नाराज झाल्याने ग्रामपंचायत कार्यालयमध्ये काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. वाकडी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीस अनुपस्थिती दाखविल्याने त्यांची चौकशी होऊन योग्य ती कारवाई करावी या मागणीचे निवेदन गटविकास अधिकारी राहाता, पोलीस स्टेशन श्रीरामपूर यांना समाजबांधवांच्या वतीने देण्यात आले. संबंधित पदाधिकाऱ्यांनी दिलगिरी व्यक्त न केल्यास सोमवारी आज दि.३ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालय समोर निषेध व्यक्त करण्यात येणार असल्याचे समाज बांधवांनी सांगितले आहेत.



## मुळा कारखाना विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** | मुळा कारखाना येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यंकटेश बेल्हेकर होते. कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. ज्येष्ठ शिक्षक आप्पासाहेब शेटे यांनी प्रस्ताविकातून टिळकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य व समाजकार्यातील कार्याचा आढावा घेतला. यानंतर विद्यार्थ्यांनी मनोगते व भाषणे सादर केली. शिक्षक जालिंदर टेमक आणि शहादेव लोणारी यांनीही विद्यार्थ्यांना टिळकांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास शिक्षिका उषा गाडेकर, प्रतिभा गवळी तसेच शिक्षक ज्ञानेश्वर ईखे, भगवान विरकर, किरण गाडे, गोविंद परदेशी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाबासाहेब पटारे यांनी, तर आभार प्रदर्शन राहुल शिंदे यांनी केले.

# पेन्शनधारकांचा प्रश्न कामगार मंत्र्यांपुढे मांडून मार्गी लावणार : खा. भाऊसाहेब वाकचौरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** | एमएसईबीच्या बाभळेश्वर येथील सभागृहात रविवारी ईपीएस-९५ पेन्शनधारकांचा जिल्हास्तरीय मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी पेन्शनधारकांच्या प्रश्नासाठी अनेक खासदारांना सोबत घेऊन केंद्रीय कामगार मंत्र्यांची भेट घेणार असून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी बोलताना खासदार वाकचौरे म्हणाले की, एसटी महामंडळ, वीज मंडळ आणि सहकार क्षेत्रातील अनेक




कर्मचाऱ्यांनी २० ते २५ वर्षे सेवा बजावली आहे. मात्र, त्यांना अत्यल्प पेन्शन मिळत असल्याने मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. एका बाजूला सरकारी कर्मचाऱ्यांना ३० हजार रुपयांहून अधिक पेन्शन मिळते, तर सहकार क्षेत्रातील कामगारांना केवळ १ ते १.५ हजार रुपये पेन्शन मिळते, ही मोठी विसंगती असल्याचे त्यांनी नमूद केले.

ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या प्रश्नासाठी गेल्या अनेक वर्षांपासून देशपातळीवर लढा सुरू असल्याचे सांगत त्यांनी संसदेतही हा विषय सातत्याने मांडला असल्याचे स्पष्ट केले. खासदार कोशियारी समितीने किमान ३ हजार रुपये, तर संसदीय समितीने ७,५०० रुपयांच्या पेन्शनची शिफारस करूनही सरकारने अद्याप निर्णय घेतलेला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

मेळाव्यात पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर यांनी ईपीएस-९५ पेन्शनवाढीच्या मागणीसाठी होत असलेल्या दिरंगाईवर नाराजी व्यक्त केली. दिल्ली येथे अनेक आंदोलने करण्यात आली असून ५ ऑगस्ट रोजी जंतर-मंतर येथे पुन्हा धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती देत त्यांनी सर्व पेन्शनधारकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष संपत समिंदर, भगवंत वाळके, आशाताई शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सुभाष पोखरकर, रहेमान (छत्तीसगड), अण्णासाहेब म्हस्के, अप्पासाहेब वाळके, बापूराव बहिरट, इंद्रसिंग राजपूत, चिंतामणी देशमुख, शरद मोरे यांच्यासह ईपीएस-९५ पेन्शनधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# द•ख•ल



## लहान मुलांमध्येही रंगला मैत्री दिन

**राहुरी :** वर्षानुवर्षे अनेक पिढ्या गेल्या तरी सुद्धा मैत्री दिन कधी कुणाला माहीत नव्हता परंतु बदलत्या काळानुसार सोशल मीडियामुळे मैत्री दिनाची क्रेज वाढत चालली आहे व त्यामुळे सोशल मीडियावर अनेकांच्या स्टेटस वर जुन्या पुराण्या आठवणींचे फोटो झळकत होते व ही मैत्री किती अतूट आहे. हे दाखविण्याचा प्रयत्न करताना सध्याची पिढी दिसत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात तरुण पिढी मित्र-मैत्रिणी एकमेकांच्या हातात मैत्रीचा धागा बांधून आमची मैत्री अतूट आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. यामध्ये लहान बालके सुद्धा कुठे मागे नाहीत हे बाळ गोपाळांनी दाखवून दिले आहे. लहान बाळ गोपाळ यांनी सुद्धा मैत्रीचा धागा किती अतूट असतो व एकमेकांना शुभेच्छा देत एकमेकांच्या हातात फ्रेंडशिप बेल्ट बांधत आनंद व्यक्त केला आहे.

## वेद लिंगेचा मंथन परिक्षेत घवघवीत यश

**श्रीरामपूर :** मंथन वेल फेअर फाउंडेशनतर्फे आयोजित राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ मध्ये श्रीरामपूर येथील एस. के. सौमय्या प्राथमिक विद्यामंदिराचा विद्यार्थी वेद वैभव लिंगे याने घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेत त्याने श्रीरामपूर तालुक्यातून नववा क्रमांक पटकावत एकूण २५० गुण मिळविले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रातांधिकारी किरण सांवत,अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, पोलीस निरीक्षक विशाल खैरे, प्रभारी गटशिक्षणाधिकारी क्रांती प्रभाकर आरसूड यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला. यावेळी, शाळा आणि मान्यवरांच्या वतीने त्याला प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. या यशाबद्दल लिंगे कुटुंबाचे व मार्गदर्शकांचे सर्वत्र कौतुक होत आहेत.

## शेती महामंडळाच्या कामगार पीएफ प्रक्रियेतील जाचक अटी रद्द करा : मागणी

**माळवाडगाव :** महाराष्ट्र शेती महामंडळाच्या हरेगाव मळ्यातील वयोवृद्ध आणि मयत कामगारांच्या वारसांना पीएफ रक्कम मिळवण्यासाठी शाळा सोडल्याचा किंवा जन्म दाखला जोडण्याची सक्ती केली जात आहे. अनेक कामगार अशिक्षित असल्याने व त्यांचे जन्म घरीच झाल्याने त्यांच्याकडे हे दाखले उपलब्ध नाहीत. परिणामी, हक्काच्या पैशांसाठी त्यांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. आधार कार्ड, पॅन कार्ड व बँक खाते उपलब्ध असतानाही प्रशासनाकडून कागदपत्रांच्या अटींवरून अडवणूक होत आहे. सतत बदलणारे अधिकारी आणि किचकट प्रक्रियेमुळे वृद्धांना उपचारासाठी आणि उदरनिर्वाहासाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे सरकारने यात तातडीने लक्ष घालून जन्मदाखला व शाळा दाखल्याची जाचक अट रद्द करावी, आणि फास्टट्रॅक पद्धतीने पीएफ रक्कम अदा करावी, अशी आर्त हाक वयोवृद्ध कामगारांनी निवेदनाद्वारे दिली आहे.

## टाकळीभान कृषी उत्पन्न बाजार समिती येथे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**टाकळीभान :** साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीरामपूरच्या टाकळीभान उपबाजार आवारात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे संचालक मयुर पटारे व विद्याताई दाभाडे व शाखाधिकारी दिनकर पवार यांच्या हस्ते विधिवत पूजन करून व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. समता, सामाजिक न्याय आणि कष्टकरी समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर लेखणी व शाहिरीच्या माध्यमातून लढणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजही समाजाला प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृतीस उजाळा देऊन विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मार्केट कमिटीचे कर्मचारी, व्यापारी, शेतकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साखर कामगारांनी काळानुरूप बदलणे गरजेचे : आ. काळे

### शिर्डी येथे साखर कामगार कार्यपद्धती मार्गदर्शन शिबिराची सांगता

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी :** पूर्वीच्या तुलनेत आज साखर कारखानदारीमध्ये मोठा बदल झाला असून अनेक कारखाने आता स्वयंचलित झाले आहेत. तंत्रज्ञान आधुनिक यंत्रणा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे कामाची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. या बदलत्या काळात भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि कारखान्याची उत्पादकता वाढवण्यासाठी साखर कामगारांनी काळानुरूप स्वतःमध्ये बदल करून आधुनिक प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे आहे असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या वतीने शिर्डी येथे आयोजित साखर कामगार कार्यपद्धती मार्गदर्शन शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना आ. आशुतोष काळे म्हणाले की, साखर उद्योग हा ग्रामीण महाराष्ट्राचा मुख्य आर्थिक कणा आहे. हा उद्योग केवळ साखर निर्मितीपुरता मर्यादित नसून यावर हजारो कामगारांच्या संसार प्रपंच अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य भाव आणि कामगारांच्या श्रमाला योग्य मोबदला देऊन त्यांना सन्मान मिळवून देण्याचे काम या उद्योगातून होते. शेतकरी आणि कामगार हे या साखर उद्योग रथाची दोन महत्त्वाची चाके आहेत. यातील एकाही चाकात बिघाड झाला तर हा उद्योगरूपी रथ पुढे चालू शकत नाही. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होण्यास मोठी मदत होत आहे.

कामगार घेत असलेल्या परिश्रमाचा त्यांना योग्य मोबदला देणे ही कारखान्याची पहिली जबाबदारी आहे. कामगार हा शेतकरी आणि साखर उत्पादक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे कामगारांच्या अडचणी व्यवस्थापन मंडळाने वेळेवर समजून घेऊन त्या सोडवल्या पाहिजेत.

कृषी, सहकार आणि साखर उद्योगाची अजितदादांना सखोल जाण होती. साखर कामगारांच्या वेतनाच्या प्रश्नावर त्रिपक्षीय समितीला योग्य सल्ला आणि मार्गदर्शन देण्याचे महत्त्वपूर्ण काम अजितदादांनी केले होते. त्यामुळे अशा प्रसंगी त्यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही असे आवर्जून सांगितले.

कारखान्याची उत्पादकता वाढवण्यासाठी, शेतकऱ्यांना जास्तीचा मोबदला देण्यासाठी आणि आपल्या कामगारांच्या वेतनात वाढवण्यासाठी भविष्यात होणारे तांत्रिक बदल कामगारांनी आत्मसात केले पाहिजेत. त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेऊन सर्वांनी या उद्योगाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प करावा असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मुळा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन भाऊसाहेब मोटे, छत्रपती सहकारी साखर कारखाना, इंदापूरचे व्हा. चेअरमन शिवाजीराव निंबाळकर, महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस रावसाहेबजी पाटील, उपाध्यक्ष दत्तात्रय निमसे, अशोकराव पवार आदींसह महाराष्ट्र राज्य साखर कामगार मंडळाचे पदाधिकारी, राज्यभरातील साखर कामगार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिर्डीत मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घालणाऱ्या तरुणी पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** साईनगरी शिर्डीत शनिवारी सायंकाळी मद्यधुंद अवस्थेतील एका तरुणीने सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घातल्याने काही काळ परिसरात खळबळ उडाली. संबंधित तरुणीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून तिच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी सातच्या सुमारास अण्णाभाऊ साठे कॉम्प्लेक्स परिसरात संबंधित तरुणी मोठ्याने ओरडत तसेच मोबाईलवर अर्वाच्य भाषेत बोलत फिरत होती. तिच्या वर्तनामुळे परिसरातील नागरिक व भाविकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर साईप्रसाद कॉम्प्लेक्स परिसरात संबंधित तरुणी व एका तरुणाची चौकशी करण्यात आली. यावेळी तरुणीने जवानांशी वाद घातल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. त्यानंतर जवानांनी परिस्थिती नियंत्रणात आणत तिला ताब्यात घेतले. पुढील कार्यवाहीसाठी संबंधित तरुणीला पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या घटनेमुळे काही काळ साईप्रसाद कॉम्प्लेक्स व परिसरात नागरिकांची गर्दी झाली होती. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.ही बातमी वृत्तपत्राच्या शैलीत अधिक औपचारिक, संतुलित आणि तथ्याधारित आहे.

## सृजन कट्टामध्ये शेतकरी आत्महत्या संदर्भात वैचारिक परिसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** येथे सृजनकट्टा शोध स्वतःचा या वाचन चळवळीचा उपक्रम पार पडला. ही चळवळ सामाजिक कार्यकर्ते महेश मापारी यांच्या सृजन मित्रमंडळाने सुरु केलेली आहे. सृजन कट्टा उपक्रमामध्ये कृषी शात्रज्ञ डॉ. अशोक ढगे यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी आत्महत्या संदर्भात एक वैचारिक परिसंवाद रविवारी अभ्यासपूर्ण वातावरणात पार पडला.

या परिसंवादाला प्रतिसाद मिळाला. सृजन कट्टा उपक्रमात पुस्तके मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिली जातात.वाचक वर्ग त्या ठिकाणी जमा होतो स्वतःच्या आवडीची पुस्तके वाचनाबरोबर आपआपले छंद सृजन कट्ट्यावर जोपासले जातात. दि.२ ऑगस्ट रोजी सकाळी महिला मुले व प्रौढवाचक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. पुस्तके वाचनानंतर पुस्तक समालोचन उपक्रमात नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'कृषीतरंग' पुस्तकाचे लेखक डॉ. ढगे यांच्या बरोबर पुस्तकासंदर्भात तात्विक वैचारिक चर्चा झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. किशोर धनवटे यांनी प्रास्ताविक केले.

याप्रसंगी इंजिनिअर संजय खर्डे,राजेंद्र चौधरी, पोतदार,ड. स्मिता लवांडे,प्रा. वाय बी शेख,निलेश जोशी यांनी चर्चेत सहभाग घेतला.यावेळी सृजनचे सर्व सदस्य उपस्थित होते. शेवटी सृजनचे सुकानु समिती सदस्य राजेंद्र चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले.

## चातुर्मास सोहळ्यासाठी श्रीरामपूर जैन संघावर स्वतंत्र निरीक्षकाची नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** येथील श्री स्थानकवासी जैन संघाच्या चालू वर्षातील चातुर्मास सोहळ्याचे संचालन, पर्यवेक्षण व व्यवस्थापन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी धर्मादाय सहआयुक्त, पुणे विभाग यांच्या आदेशानुसार स्वतंत्र निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. धर्मादाय सहआयुक्त सौ. निवेदिता एस. पवार यांनी मिसलेनियस अर्ज क्र. १००/२०२६ वर सुनावणी करत हा अंतरिम आदेश दिला.

ट्रस्टचे मान्यताप्राप्त सहा सभासदांनी ट्रस्टच्या निवडणुका व व्यवस्थापनासंदर्भातील वाद अंतिम निकाली निघेपर्यंत चातुर्मास निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी तात्पुरते निर्देश देण्याची मागणी केली होती. सुनावणीदरम्यान बदल अहवाल क्र. ७७२/२०२४ फेटाळण्यात आल्याचे तसेच पूर्वीचे बदल अहवालही प्रलंबित असल्याने कायदेशीर मान्यता प्राप्त विश्वस्त मंडळ अस्तित्वात नसल्याचे नमूद करण्यात आले. आदेशानुसार उपधर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांच्या मार्फत नियुक्त स्वतंत्र निरीक्षक चातुर्मासासह प्रवचने, पूजा, सामायिक, स्वाध्याय, धार्मिक मिरवणुका, सामुदायिक प्रार्थना, आध्यात्मिक सभा आणि धर्मादाय उपक्रमांचे संचालन व देखरेख करणार आहे. हा आदेश केवळ चालू वर्षातील चातुर्मास संपेपर्यंत अथवा अंतिम अहवाल सादर होईपर्यंत लागू राहणार असून आवश्यकतेनुसार त्यात बदल करण्याचा अधिकार प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने ड. प्रेरणा एम. आळे यांनी कामकाज पाहिले. या निर्णयाचे समाजातील विविध घटकांनी स्वागत केले असून धर्मादाय विभागाने नियुक्त केलेल्या समितीने सर्व समाजबांधवांना सोबत घेऊन पारदर्शक पद्धतीने काम करण्याची भूमिका व्यक्त केली.

## विकासकामांत अडथळे आणणाऱ्यांना जनता उत्तर देईल : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील निमज येथे सुमारे ८९ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ तसेच सरस्वती पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यक्रम आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी बोलताना विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करणाऱ्यांना योग्य वेळी जनताच उत्तर देईल, असा इशारा त्यांनी विरोधकांना दिला.

आमदार खताळ म्हणाले, गावाच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. आमदार झाल्यापासून कोणत्याही गावाला निधी देताना कधीही भेदभाव केला नाही. कमी मतदान झालेल्या गावांनाही समान न्याय देण्याची भूमिका ठेवली असून विकासकामे कोणत्याही परिस्थितीत थांबू देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पूर्वी ग्रामपंचायतीतील राजकारणामुळे मंजूर झालेला निधी परत गेल्याची खंत व्यक्त करत, गावाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहनही त्यांनी केले.

राज्यातील २८८ आमदारांमध्ये स्वतःला सर्वात नशीबवान समजत असल्याचे सांगताना, संगमनेरच्या जनतेच्या आशीर्वादामुळे विधानसभेत पोहोचल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून तालुक्यातील सिंचन प्रकल्पांना गती मिळाली असून भोजापूर चारीच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचविण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. साकूर पठार भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी उपसा सिंचन व बॅरेज बंधाऱ्यांसाठी सुमारे १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी वीजबिल माफी, कर्जमाफीसारखे निर्णय घेतल्याचा उल्लेख करत, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी आतापासून तयारीला लागावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे, भाजपचे दादाहाऊ गुंजाळ, सरस्वती पतसंस्थेचे संस्थापक काशिनाथ डोंगरे, चेअरमन बादशाह गुंजाळ, माजी सरपंच गोरक्ष डोंगरे, संदीप कासार यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराजस्व समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### २,७४२ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



(छाया : अमोल कदम)

**श्रीरामपूर :** तहसील कार्यालय, श्रीरामपूर यांच्या वतीने शनिवार (दि. १) रोजी दत्तनगर येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध शासकीय विभागांनी एकाच ठिकाणी सेवा उपलब्ध करून दिल्याने २,७४२ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळाला. शिबिराचे उद्घाटन आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते झाले. यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे, माजी सभापती बाबासाहेब दिघे, नगरसेवक अण्णासाहेब डावखर, प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, नगरसेविका मंजुषा मुरकुटे आदी उपस्थित होते.

यावेळी आमदार हेमंत ओगले म्हणाले, शासनाच्या योजना थेट सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महसूल समाधान शिबिर हा अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ व महसूल प्रशासन सकारात्मक पद्धतीने कार्यरत असल्याने नागरिकांना योजनांचा लाभ वेळेत मिळत आहे. नोंदणी, मोजणीसह प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून अशी शिबिरे तालुक्यातील इतर मोठ्या गावांतही आयोजित करावीत, असे त्यांनी सांगितले.

शिबिरात जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत १,१५६, तर इतर राज्य शासनाच्या योजनांत १,०९९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. याशिवाय घरकुल, मुख्यमंत्री बळीराजा शेत, पांदण रस्ते, कुंभार समाज सवलत तसेच केंद्र व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. पशुसंवर्धन, महिला व बालविकास, पंचायत समिती, कृषी, नगरपरिषद, आरोग्य विभाग, पोस्ट कार्यालय व तहसील कार्यालयाच्या विविध शाखांनी सेवा केंद्र उभारून प्रधानमंत्री आवास योजना, संजय गांधी निराधार योजना, ईडब्ल्यूएस व जात प्रमाणपत्र, रेशनकार्ड दुरुस्ती, आधार नोंदणी, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरासह विविध सेवा उपलब्ध करून दिल्या.

## जगदीश गागरे आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित

**साकुर :** पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथील माजी उपसरपंच प्रगतशील शेतकरी जगदीश पाटील गागरे यांना आदर्श शेतकरी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे. नुकतेच भाळवणी येथील महसूल विभाग महाराष्ट्रशासनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज व महाराजस्व शिबिराच्या औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पारनेर तालुक्यातील भाळवणी येथे हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. आ. काशिनाथ दाते यांच्या वतीने जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते जगदीश गागरे यांना सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आला. यावेळी संदीप रोहकले, श्रीरंग गागरे, सुदाम जाधव, भाऊसाहेब गागरे, मंगेश गागरे, संतोष बागुल यांसह गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

## आ. लंघे यांनी घेतले साईबाबांच्या समाधी मंदिरात दर्शन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि लाखो भाविकांचे श्रद्धेचे केंद्र असलेल्या शिर्डी येथील श्री साईबाबांच्या समाधी मंदिरात दर्शन घेऊन श्री साईंच्या पवित्र चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.यावेळी मतदारसंघातील नागरिकांचे जीवन सुखी, समृद्ध आणि आनंदी व्हावे, परिसरात शांतता, विकास आणि सर्वांगीण प्रगती नांदो, अशी त्यांनी श्री साईचरणी प्रार्थना केली. या प्रसंगी शिर्डी संस्थानच्या वतीने उपकार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांच्या हस्ते आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांचा स्वागतपर सत्कार करण्यात आला श्रद्धा आणि सबुरी हा साईबाबांचा कालातीत संदेश जनसेवा, प्रामाणिकपणा आणि लोककल्याणाच्या कार्यात सतत प्रेरणादायी ठरो, तसेच समाजहितासाठी सुरू असलेल्या प्रत्येक उपक्रमाला श्री साईबाबांचे आशीर्वाद लाभोत अशीही प्रार्थना आमदार लंघे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बाळासाहेब पवार,राजेंद्र मते आदी पदाधिकारी स्वीय सहायक विजय पवार उपस्थित होते.

## पान १ वरुन

### राज्यातील पाणीसाठा ६८.८७ टक्क्यांवर

धरणांतूनही विसर्ग केला जात आहे. पुणे जिल्ह्यातील सुमारे १९ धरणांतून विसर्ग सुरू असून, भीमा, मुठा, पवना, कुकडी, मीना, नीरा, घोड आणि हंगा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. नाशिकमधील गंगापूर, दारणा, कडवा, पालखेड, नगरमधील भंडारदरा, देवठाण आणि कोल्हापूरमधील राधानगरी धरणांतूनही पाणी सोडण्यात येत आहे. मराठवाड्यातील प्रमुख धरणांच्या पाणीसाठ्यातही सम ाधानकारक वाढ झाली आहे. जायकवाडी धरणात ८७.१४ टक्के, तर विष्णुपुरी धरणात ९८.०८ टक्के पाणीसाठा झाला आहे. येलदरीम ध्ये ५८.२२ टक्के आणि पेनगंगा-इसापूरमध्ये ६०.४४ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. मात्र, माजलगाव, मांजरा, तेरणा, दुधना, सिद्धेश्वर आणि सीना-कोळेगाव या धरणांमध्ये अद्याप पाणीसाठा कमी आहे. त्यामुळे बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांतील काही भागांना आणखी पावसाची गरज आहे. पूर्व विदर्भातही गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे. तोतडोह, गोसीखुर्द, उर्ध्व वर्धा आणि अरुणावती या धरणांमध्ये समाधानकारक साठा झाला आहे. गोसीखुर्द धरणातून १९,८६४ क्युसेक, तर बेंबळा धरणातून १,६२४ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. पावसाचा जोर आणि धरणांमध्ये सुरू असलेली आवक पाहता आगामी काळात राज्यातील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीला चिंतेत असलेल्या जलसाठ्याला जुलै महिन्यात मोठा दिलासा मिळाला आहे.

### धर्मांतरविरोधी कायद्यावर राष्ट्रपतींची मोहोर

गोपनीयतेच्या अधिकारावर गदा आणणारा असल्याचा त्यांचा दावा होता. तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने विधेयकाला पाठिंबा दिला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कायद्याचे समर्थन करताना स्पष्ट केले होते की, स्वेच्छेने होणारे धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाह रोखणे हा उद्देश नसून बळजबरी, फसवणूक आणि आमिषाद्वारे होणाऱ्या धर्मांतराला प्रतिबंध करणे हा कायद्याचा हेतू आहे. राज्य सरकारच्या मते अशा घटनांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी हा कायदा महत्त्वाचा ठरेल.

### रिपब्लिकन नेते अशोक गायकवाड यांचे निधन

उपनेते स्वर्गीय आ. अनिल भैया राठोड यांनाही जेलची हवा मि ळाली होती. राजकीय दृष्ट्या कितीही मतभेद असले तरी स्वर्गीय अशोकराव गायकवाड यांचे सर्व पक्षात सलोख्याचे संबंध होते. ना. रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, रा.सु. गवई, जोगेंद्र कवाडे या आरपीआय नेत्यांशी त्यांचा जवळचा संबंध होता. त्यांची राजकीय सुरुवात मा. खा. यशवंतराव गडाख यांच्यापासून सुरू झाली. मा. खा. गडाख यांचे ते निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून समजले जात. दरम्यानच्या काळात ते दोन वेळा जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यानंतर मुळा सहकारी साखर कारखान्यावर ते संचालक म्हणून कार्यरत होते. मागील महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्यांनी स्वर्गीय अनिल भैय्या राठोड व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. परंतु ते जास्त काळ तेथे रमले नाहीत. महायुती सरकारच्या काळात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित दादा पवार यांच्या पक्षात प्रवेश केला. आ. संग्राम भैय्या जगताप यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. आंबेडकरी चळवळीमध्ये काम करत असताना मोठा संघर्ष त्यांनी केला. समाजाच्या प्रश्नावर ते पोट तिडकेने लढा देत होते. जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीला दिशा देण्याचे काम त्यांनी केले. स्वर्गीय अशोकराव गायकवाड यांच्या अकाली निधनामुळे आंबेडकरी चळवळीसह सर्वच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. स्वर्गीय गायकवाड यांच्या जाण्यामुळे एक अभ्यासु मार्गदर्शक हरपल्याची भावना कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.

### महिलांच्या गोंधळाने गाजली शिक्षक बँकेची सभा

या वार्षिक सभेत विरोधी गटाने घोषणाबाजी फलकबाजी व नारे बाजी करून सभागृह दणाणून सोडले. या वार्षिक सभेच्या कळीचा मुद्दा ठरलेला शेड्युल बँकेचा विषय गुरुमाऊली सदिच्छा मंडळाचे अध्यक्ष संतोष दुसुंगे यांनी सभागृहाचा कल व गुरुवारी सदिच्छा मंडळाच्या पार्टी मीटिंगमध्ये निर्णय पाहता शेड्युल बँकेचा विषय स्थगित करण्याची मागणी केली.सभेचे अध्यक्ष घुले यांनी विषय स्थगित केल्याचे घोषित केले.त्यामुळे विरोधकांच्या मागणीतील हवा निघून गेली.त्यामुळे ते आणखी चिडले. माजी चेअरमन डॉक्टर संदीप मोटे हे सूचना देत असल्याने श्रीगोंदा तालुक्यातील काही सभासदांनी त्यांना रोखण्याची मागणी केली. बँकेच्या अध्यक्षांनी बोलले पाहिजे, हे का बोलतात? असा प्रश्न (पान ४ वर)अविनाश निंभोरे व इतरांनी उपस्थित केला. या सर्व गोंधळात गुरुमाऊली सदिच्छा मंडळाचे नेते आणि बँकेचे बापूसाहेब तांबे यांनी माईकचा ताबा घेतला आणि विरोधकांवर चिमटे काढले. डीसीपीएस धारक शिक्षकांची मोठी मागणी आहे की कुटुंब आधार निधीम ध्ये त्यांच्यासाठी वाढ करावी. त्यांनी वीस लाखाची मागणी केली आहे. मात्र गुरु माऊली सदिच्छा मंडळाकडून २१ लाख रुपये निधी देण्यात यावा असे त्यांनी सुचवले. बँकेच्या शैक्षणिक वाहन व ग्रह कर्जाचा व्याजदर ७.९० ऐवजी ७ टक्के करण्यात यावा. बँकेच्या कर्ज मर्यादेमध्ये पाच लाख रुपयांची वाढ करण्यात यावी. सध्या बँक बावन्न लाख रुपये कर्ज देते ती मर्यादा आता ५७ लाख रुपये झाली आहे. बँकेतर्फे सभासदांच्या पाल्यांना दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करून पारितोषिकाची रक्कम दुप्पट करण्यात यावी. बापू तांबे यांच्या भाषणानंतर सभेचा नूर पालटला. विरोधकांना बोलण्यासाठी कोणताच मुद्दा शिल्लक न ठेवता दिड वाजता सभेच्या अध्यक्षांनी जेवणाची सुट्टी घोषित केली. त्यामुळे विरोधक चिडले. विराधी गटाचे प्रवीण ठुबे यांनी सभासदांनी जेवण करू नये सत्ताधाऱ्यांना करू द्या आपण सभा सुरु ठेवू असे सांगून माईक चा ताबा घेतला.नंतर विरोधी गटाकडून दोन-तीन जणांनी आपले मनोगत व्यक्त केले व सर्वजण सभागृह सोडून निघून गेले. जेवणाच्या सुट्टीनंतर सभा पुन्हा सुरू झाली.राजेंद्र ठोकळ नारायण पिसे विक्रम अडसूळ व इतरांनी यावेळी अनेक सूचना केल्या व सर्व विषय मंजूर करण्यात आले.शेवटी संचालक कैलास सारोक्ते यांनी आभार मानले. सभेचे सूत्रसंचालन अकोल्याचे संचालक अण्णासाहेब आभाळे यांनी केले.

## रोडवर टाकलेले मुरुमाचे ढिगारे हटवून रस्ता खुला करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर :** देवगांव --लासूर -गंगापूर-या महत्त्वाच्या राज्य महामार्गावरील काम संथगतीने सुरू असून व सध्या पाऊस सुरू असून येण्या जाण्यासाठी रस्ता अरुंद असल्याने त्यातच बनवण्यात आलेल्या रोडवर संबंधित ठेकेदाराने ठीक ठिकाणी मुरुमाचे ढीगारे टाकल्याने वाहनधारकांना एकाच साईडने वाहन चालवावे लागत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे.सदरिल मुरुमाचे ढीगारे हटवून रोड खुला करुन सुरु असलेल्या कामास जलदगतीने करण्याची मागणी वाहनधारक व नागरिकांकडून केली जात आहे.

गंगापूर लासुर रोडचे काम सुरू होऊन जवळपास एक वर्ष होत आले मात्र दरम्यान हे काम सहा ते सात कीलोमीटरचे झाले असून त्यात ही ठीक ठिकाणी अर्धवट आहे. अनेक ठीकाणी रोडचे काम चार महीण्यापासून खोदून ठेवल्याने दररोज छोटे मोठे अपघात होत असून नागरिक, शासकीय कर्मचारी,शाळकरी विद्यार्थी वाहनधारकांना गंगापूर येथे जाण्यासाठी मोठा अडचणीचा सामना करावा .

> देवगांव --लासूर -गंगापूर-या महत्त्वाच्या राज्य महामार्गावरील काम संथगतीने सुरू असून व सध्या पाऊस सुरू असून येण्या जाण्यासाठी रस्ता अरुंद असल्याने त्यातच बनवण्यात आलेल्या रोडवर संबंधित ठेकेदाराने ठीक ठिकाणी मुरुमाचे ढीगारे टाकल्याने वाहनधारकांना एकाच साईडने वाहन चालवावे लागत असून सदरिल मुरुमाचे ढीगारे त्वरित हटवून संथ गतीने सुरू असलेले रोडचे कामाची गती वाढवून काम तातडीने पूर्ण करावे.
>
> **-अनिल राजगिरे -**
> **सरपंच**
> **ग्रामपंचायत तांदुळवाडी.ता.गंगापुर,**

## ५४व्या वर्षीही विनावेतन ज्ञानदानाची धडपड

**सचिन रुपनवर| राष्ट्र सह्याद्री**



**केडगाव :** वयाची ५४ वर्षे पूर्ण झाली, निवृत्तीचे वय जवळ आले, तरी गेल्या १४ ते १५ वर्षांपासून एकही रुपया वेतन न घेता ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकाची व्यथा समोर आली आहे. नाथाचीवाडी येथील शिक्षक उत्तम बरकडे हे आंबेगाव येथे नोकरी करीत असून, शासनाकडून आजपर्यंत त्यांना वेतन मिळालेले नाही. आर्थिक अडचणींचा सामना करीतही त्यांनी ज्ञानदानाचे कार्य सुरू ठेवले आहे. नाथाचीवाडी ते आंबेगाव असा दररोज सायकलने प्रवास करून बरकडे शाळेत आपले कर्तव्य बजावत आहेत. गेल्या दीड दशकापासून विनावेतन काम करूनही त्यांनी शिक्षण क्षेत्रातील आपली सेवा थांबविलेली नाही. मात्र, वयाच्या ५४व्या वर्षीही शासनाकडून वेतनाचा एकही रुपया मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. कुटुंबातील कर्ता व्यक्ती म्हणून घराची जबाबदारी सांभाळताना नियमित उत्पन्न नसल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे बरकडे यांनी सांगितले. त्यांचा मुलगा सध्या अकरावीमध्ये शिक्षण घेत असून, त्याच्या शिक्षणाचा खर्च भागविताना मोठी काटकसर करावी लागत आहे. सध्या बरकडे यांच्या पत्नी आशा वर्कर म्हणून काम करीत असून, त्यांच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू आहे. वेतन सुरू व्हावे यासाठी बरकडे यांनी अनेक वेळा शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजविले. संबंधित कार्यालयांमध्ये वारंवार हेलपाटे मारूनही त्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले गेले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. आज ना उद्या वेतन सुरू होईल, या आशेवर त्यांनी आपले काम सुरू ठेवले आहे.पुणे जिल्ह्यातच नव्हे, तर महाराष्ट्रातही एवढ्या प्रदीर्घ काळापासून विनावेतन सेवा करणारा शिक्षक शोधूनही सापडणार नाही, अशी परिस्थिती आहे. निवृत्तीचे वय जवळ आले असतानाही आपल्या सेवेचा मोबदला मिळालेला नसल्याने बरकडे यांच्यासमोरील आर्थिक संकट अधिक गंभीर झाले आहे. संस्था तसेच शासकीय पातळीवर अनेक वर्षे पाठपुरावा करूनही अद्याप त्यांच्या वेतनाचा प्रश्न सुटलेला नाही. वारंवारच्या हेलपाट्यांमुळे ते थकले असले तरी त्यांनी ज्ञानदानाची जिद्द सोडलेली नाही. शासनाकडून कधीतरी वेतन सुरू होईल आणि आपल्या प्रदीर्घ सेवेची दखल घेतली जाईल, या आशेवर बरकडे आजही शाळेत ज्ञानदानाचे कार्य निष्ठेने सुरू ठेवत आहेत.

## राज्यातील पाणीसाठा ६८.८७ टक्क्यांवर ४९ धरणांतून विसर्ग सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे राज्यातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली आहे. गेल्या आठ दिवसांतच धरणसाठ्यात तब्बल १५२ टीएमसी पाण्याची भर पडली असून, जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील ३,०२९ प्रकल्पांमध्ये ९७९.४० टीएमसी म्हणजेच ६८.८७ टक्के पाणीसाठा झाला आहे. पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाल्याने राज्यातील ४९ धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

गेल्या वर्षी याच कालावधीत राज्यातील धरणांमध्ये ७१.१५ टक्के पाणीसाठा होता. त्या तुलनेत यंदाचा साठा सुमारे २.३ टक्क्यांनी कमी आहे. मात्र, पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणांतील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

यंदा ३१ मेअखेर राज्यातील धरणांमध्ये केवळ ३९५ टीएमसी म्हणजे सरासरी २७ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. त्यामुळे पावसाळ्यात चांगल्या पावसाची आवश्यकता होती. जूनमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्याने धरणांमध्ये पाणीसाठा वाढला नाही. मात्र, जुलैच्या सुरुवातीपासून ९ जुलैपर्यंत राज्यातील अनेक भागांत दमदार पाऊस झाला. त्यानंतर काही काळ पावसाने उघडीप दिली. २० जुलैनंतर पुन्हा विविध भागांत मुसळधार पाऊस झाल्याने धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी दाखल झाले.गेल्या महिनाभरात धरणांमध्ये ५८४.३९ टीएमसी पाण्याची आवक झाली आहे. त्यामुळे अनेक धरणांतील पाणीसाठा ५० टक्क्यांहून अधिक झाला.

## 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात १६ ऑगस्टला अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलन'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विचारवेध साहित्य संमेलना'चे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन येत्या १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता विद्यापीठ परिसरात संपन्न होणार आहे, अशी माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली.

पद्मपाणी फाऊंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कर्मचारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील पुरोगामी विचार आणि सामाजिक संदेश आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे.

या संमेलनाबाबत पद्मपाणी फाऊंडेशनचे अध्यक्ष व निमंत्रक राहुल डंबाळे, सहसंयोजक सतिष वाघमारे, कर्मचारी संघाचे संतोष मदने, तसेच संयोजन समितीचे प्रा. वैशाली देठे, सुवर्णा डंबाळे, डॉ. राहुल ससाणे आणि अक्षय कांबळे यांनी सविस्तर माहिती दिली आहे. या संमेलनात विविध वैचारिक सत्रांचे आणि साहित्यिक चर्चांचे आयोजन केले जाणार असून, नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## इन्स्टाग्रामवरील ओळखीनंतर अत्याचार
### आरोपीविरुद्ध शिर्डी पोलिसांकडे गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** सोशल मीडियावरील इन्स्टाग्रामच्या माध्यमातून झालेल्या ओळखीचे प्रेमसंबंधात रूपांतर झाले. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप डोणगाव (ता. वैजापूर) येथील आकाश दगू कसबे याच्यावर करण्यात आला आहे. पीडित तरुणीच्या तक्रारीवरून विरगाव पोलिस ठाण्यात १ ऑगस्टच्या सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटना शिर्डी परिसरात घडल्याने पुढील तपासासाठी हा गुन्हा शिर्डी पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीनुसार, शिर्डी येथील २२ वर्षीय तरुणीची सुमारे वर्षभरापूर्वी इन्स्टाग्रामवरून आकाश कसबे याच्याशी ओळख झाली होती. ओळखीनंतर दोघांमध्ये मोबाईलवर नियमित संवाद सुरू झाला. कालांतराने मैत्रीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. आरोपीने आपण एकाच समाजातील असल्याचे सांगून लग्न करण्याचे आश्वासन दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, फेब्रुवारी २०२६ पासून आरोपी तरुणीला लॉजवर भेटण्याचा आग्रह करत होता. सुरुवातीला तिने नकार दिला. मात्र, लग्नाचे वारंवार आश्वासन दिल्यानंतर एप्रिल २०२६ मध्ये ती भेटण्यास तयार झाली. त्यानंतर आरोपीने शिर्डी येथील एका लॉजमध्ये नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर १५ एप्रिल व ३ मे २०२६ रोजीही त्याच लॉजमध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

मे महिन्यात मासिक पाळी न आल्याने गर्भधारणा चाचणी करण्यात आली. त्यात ती गर्भवती असल्याचे समोर आले. याबाबत आरोपीला माहिती दिल्यानंतर त्याने लवकरच लग्न करू, अशी हमी दिली. त्यानंतर आरोपी तरुणीला डोणगाव येथील आपल्या घरी घेऊन गेला. ती तेथे दोन दिवस राहिली. मात्र, नंतर घरच्यांचा विरोध असल्याचे कारण देत त्याने लग्न पुढे ढकलण्यास सुरुवात केली. काही दिवसांनी त्याने लग्नास स्पष्ट नकार देत तरुणीचा मोबाईल क्रमांकही ब्लॉक केल्याचा आरोप आहे.

दरम्यान, सलग तीन महिने मासिक पाळी न आल्याने तरुणीच्या आईने २४ जुलै २०२६ रोजी तिला एका खासगी रुग्णालयात नेले. तेथे करण्यात आलेल्या सोनोग्राफीमध्ये ती सुमारे तीन महिन्यांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तरुणीने आईसमवेत विरगाव पोलिस ठाण्यात धाव घेत आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून प्राथमिक कार्यवाही केली असून, घटना शिर्डी परिसरात घडल्यामुळे पुढील तपासासाठी प्रकरण शिर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.


### Change of Name

Old name: RESHMA PATHAN IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is RESHMA IMTIYAZ PATHAN as on Aadhar Card Number is 5071 4495 8881 (02/08/2026)

### Change of Name

Old name: IMTIYAZ PATHAN IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is IMTIYAZ MAHEBUB PATHAN as on Aadhar Card Number is 2299 2731 2817 (02/08/2026)

### Change of Name

MY HUSBANDS Old name: IMITYAZ PATHAN IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is IMTIYAZ MAHEBUB PATHAN as on Aadhar Card Number is 2299 2731 2817 (02/08/2026)


## सौंदाळा येथे अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** तालुक्यातील सौंदाळा येथे साहित्यरत्न डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती लहुजी चौकामध्ये भारतीय लहुजी सेना व सखल मातंग समाज व बहुजन समाज यांच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी भेंडा गावचे युवा सरपंच किशोर मिसाळ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर माजी जि प सदस्य दिलीप सरोदे, रामभाऊ केंदळे, भास्करराव कणगरे, नगरसेवक प्रवीण सरोदे, शंकरराव भारस्कर,मानव साळवे,दासू आढागळे, स्वप्नील सोनकांबळे,सागर शिरसाठ,उदय गोर्डे,नारायण आरगडे,प्रहार संघटनेचे अध्यक्ष जालिंदर आरगडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजक सागर आढागळे,प्रथमेश आढागळे,भारत नेटके आकाश आढागळे,विकास नेटके,राहुल आढागळे, सागर राधवे, राजू मिसाळ यांनी जयंती कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले तर प्राध्यापक शेंडगे यांनी आभार मानले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य टिळक हे सामाजिक जडणघडणीतील थोर व्यक्तिमत्व होते असे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले आहे. श्रीरामपूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी कार्यक्रम प्रसंगी ओगले बोलत होते. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्ष करण दादा ससाणे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे उपनगराध्यक्ष कांचन ताई सानप,पं.स. च्या माजी सभापती वंदनाताई मुरकुटे, तालुका अध्यक्ष प्रमोद भोसले, काँग्रेसचे शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, मा.नगरसेवक दिलीप नागरे, दीपक वमने,डॉ.दिलीप शिरसाठ,सौ वैशालीताई पोटे,रितेश एडके, योगेश जाधव, श्याम अडांगळे, गोपाल लिंगायत, संतोष परदेशी, पंडितराव बोंबले, विलास लबडे, बिट्टू कक्कड आणि इतर उपस्थित होते.

## निधन वार्ता

### वेणुनाथ शिंदे



**राहुरी:** राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथील ज्येष्ठ पत्रकार वेणुनाथ रामचंद्र शिंदे (वय ७६ वर्षे) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी संदीप व रमेश ही दोन मुले व तीन मुली असा परिवार असून शिंदे यांनी पत्रकारितेत आपला वेगळा ठसा उमटविला होता.

### कचेश्वर दातीर



**झरेकाठी ;** संगमनेर तालुक्यातील दाढ खुर्द येथील सेवानिवृत्त शिक्षक कचेश्वर कोंडाजी दातीर (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंड जावई असा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी प्रकाश दातीर, महेंद्र दातीर, कल्पना जोशी यांचे ते वडील होते

## शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासकीय यंत्रणेत सहभाग आवश्यक : ॲड. अजित काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान :** शेतकऱ्यांच्या प्रश्नांची प्रभावी सोडवणूक करण्यासाठी केवळ आंदोलने करून चालणार नाही, तर शासकीय यंत्रणेत सहभाग वाढवून व्यवस्था बदलणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजितराव काळे यांनी केले.

बेलपिंपळगाव (ता. नेवासा) येथे प्रा. कार्लस साठे व माजी उपसरपंच बंडोपंत चौगुले यांच्या पुढाकाराने प्रा. साठे यांच्या फार्महाऊसवर आयोजित शेतकरी संघटनेची बैठक व भव्य शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ शेतकरी नेते हरीअप्पा तुवर, राष्ट्रवादी किसान सभा उत्तर नगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, साहेबराव चोरमल, मेजर अशोक काळे, वसंतराव शेरकर, शरद आसने, भास्कर मुठे, बी. डी. शिंदे, खंडेराव सरोदे, पत्रकार भाऊसाहेब काळे आदी उपस्थित होते.

ॲड. काळे म्हणाले, शेतकरी संघटना ही शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने लढणारी संघटना असून, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, सातबारा कोरा, शेतीमालाला हमीभाव आणि १२ तास अखंड वीजपुरवठा या प्रमुख मागण्यांसाठी संघटना संघर्ष करत आहे. सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असून उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याने कर्जबाजारीपणा वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला.

प्रास्ताविकात प्रा. कार्लस साठे यांनी, ''ना पक्ष, ना जात, ना धर्म; फक्त शेतकरी म्हणून एकत्र या,'' असे आवाहन केले. हरीअप्पा तुवर, राजेंद्र कोकणे, साहेबराव चोरमल, मेजर अशोक काळे, गणेश चौगुले आणि पत्रकार भाऊसाहेब काळे यांनीही मनोगते व्यक्त केली.

मेळाव्यास परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ आणि संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेत प्रवेश केला. कार्यक्रमाचे आभार बी. डी. शिंदे यांनी मानले. मेळाव्यात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून आगामी आंदोलनांची दिशा निश्चित करण्यात आली.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि .३ ऑगस्ट २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-७ | १६०<br>१२४<br>११७ | जोड<br>५४-६७-३०<br>९८-१५ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२५<br>२६०<br>४४० | ८-१ | १४६<br>१२८<br>११९ | जोड<br>८०-५१-३४-<br>२९-१७ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १३७<br>३८०<br>३३५ | १-२ | १५६<br>१२९<br>११० | जोड<br>१०-७२-६९<br>८४-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

## द•ख•ल

### वाळकीत महिलेला मारहाण करून विनयभंग

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील वाळकी परिसरात एका महिलेला किरकोळ कारणावरून मारहाण करत तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपी रोहित सुभाष गाडे (रा. वाळकी, ता. जि. अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, दि. २९ जुलै रोजी सायं. ७.३० वा.च्या सुमारास वाळकी येथील शांतीनगर भागात ही घटना घडली. पीडित महिलेचा मुलगा आरोपीच्या भावाच्या घरी कशासाठी गेला होता? या क्षुल्लक कारणावरून आरोपी रोहित गाडे याने महिलेशी वाद घातला. दरम्यान आरोपीने महिलेला अश्लील शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच महिलेचा विनयभंग होईल असे असभ्य वर्तन केले. या घटनेनंतर पीडित महिलेने नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून रोहित सुभाष गाडे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहा. पो. नि. गणेश वारुळे हे करत आहेत.

### अण्णाभाऊंच्या अस्थीमुळे बोधेगावला महत्वाचे स्थान : अंधारे



**हातगाव :** अवघ्या दीड दिवसाचे शिक्षण घेणाऱ्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कारकिर्दीत ज्या कादंबऱ्या लिहिल्या आहे त्या निश्चितच परिवर्तनवादी विचारसरणीच्या असून अशा थोर व्यक्तिमत्वाचे विचार प्रत्येकाने अंगीकारणे काळाची गरज आहे असे मत ग्राममहसूल अधिकारी बाबासाहेब अंधारे यांनी व्यक्त केले आहे. शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात अण्णाभाऊंच्या १०८ व्या जयंती निमित्त आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. यावेळी शाहूराव खंडागळे यांनीही आपले व्यक्त केले आहेत. यावेळी प्रसाद पवार, संगीता ढवळे, प्रकाश भोसले, राम अंधारे, फिरोज पठाण, अरुण झांबरे, भाऊराव भोंगळे, मयूर हुंडेकरी, बबन कुरेशी, भागवत भोसले, बन्सी मिसाळ, नवनाथ मिसाळ, संदीप मिसाळ, अंबादास मिसाळ, शिवनाथ मिसाळ, संतोष मिसाळ, सोमनाथ मिसाळ, संतोष घोरपडे, एकनाथ मिसाळ, ऋतिक मिसाळ, संतोष बाणाईत, कचरू मिसाळ, विनोद मिसाळ, बाळू मिसाळ, आकाश मिसाळ, अनिल मिसाळ, विकास मिसाळ यांच्यासह असंख्य सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

### टाकळी ढोकेश्वरात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी



**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायत कार्यालयात या दोन्ही महामानवांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले आणि त्यांना नमन करण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच अरुणा खिलारी, शिवाजीराव खिलारी, श्रावण गायकवाड, दीपक साळवे, विक्रम झावरे, बबलू झावरे, मळीभाऊ रांधवन, देविदास आल्हाट, सुनील माकरे, पिंटू जाधव, संकेत झावरे, संदीप आल्हाट, श्यामा आल्हाट, सुशांत आल्हाट, प्रतीक चव्हाण, लक्ष्मीकांत आल्हाट, गणेश वैराळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी एकत्र येऊन दोन्ही थोर पुरुषांना आदरांजली अर्पण केली.

### आण्णाभाऊंनी साहित्यातून कष्टकऱ्यांच्या भावना मांडल्या : प्रा. खिलारी



**टाकळी ढोकेश्वर :** अवघे दिड दिवस शाळेत गेलेल्या आण्णाभाऊ साठे यांनी प्रतिकूल परिस्थितीत जिद्द आणि मेहनतीच्या बळावर मोठे यश मिळवले. त्यांनी आपले साहित्य, शाहीरी आणि लोककलेतून समाजातील वंचित, कष्टकरी आणि सामान्य माणसाच्या व्यथा आणि भावना जगासमोर मांडल्या असे प्रतिपादन प्रा. बाळासाहेब खिलारी यांनी केले. या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयात पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी अशा दोन गटात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये प्रियल झावरे, मनस्वी झावरे, विराज बांडे, कृष्णा दिवेकर,वैष्णवी चव्हाण, प्रियंका खराबी, प्रतीक्षा कोरडे,समृद्धी जांभळकर, स्वरा घोडके, कारुण्या आल्हाट,सावनी तराळ,स्वरा खोडदे,अलिझ्झा हवालदार,सुर्वी गायकवाड,वेद दाते,स्वरा साळुंके, आदिल पिंजारी,आर्यन भद्रे,प्रज्वल आल्हाट या विद्यार्थ्यांनी खुप चांगल्या प्रकारे या तीनही विभुतींच्या जीवनावर प्रकाश टाकला. परीक्षक म्हणून सुमन वाळुंज, वर्षा भोंडवे, विष्णू भद्रे यांनी काम पहिले.पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी देखील विद्यार्थ्यांना आजच्या दिवशी राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी,शिस्त,परिश्रम आणि मानवतेची मूल्ये जीवनात रुजवण्याचा प्रयत्न करावा असे मार्गदर्शन केले. या प्रसंगी निलम खिलारी, प्रिया डव्हणे, कल्पना जाधव, अतुल सैद, सुरेखा ठाणगे, मीनाक्षी पवार, नारायण शेळके, श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, संदीप खिलारी, शिरीष राऊत, अनुष्का कांबळे, सोनाली माळवादे, पवन कुटे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले, प्रास्ताविक रविंद्र मते यांनी केले तर आभार वैशाली गायखे यांनी मानले.

### वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठानतर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**अहिल्यानगर :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठान यांच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

# आठ दिवसांपासून विजेचा लपंडाव

## ग्रामस्थांची रात्र अंधारात; महावितरण झोपेत!

**शिवाजी बोंद्रे। राष्ट्र सह्याद्री**

**वारंवार तक्रारींनंतरही कर्मचारी व अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष; एकाच तारेला आकड्यांचा भार, नागरिक संतप्त**

**कोरडगाव :** कोरडगावातील पदाईमाता चौक ते बोंद्रे गल्ली परिसरात गेल्या आठ दिवसांपासून वीजपुरवठ्याचा अक्षरशः खेळखंडोबा सुरू असून महावितरणच्या ढिसाळ नियोजनाचा फटका नागरिकांना बसत आहे. दहा मिनिटेही वीज टिकत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले असून वारंवार फोन करूनही संबंधित कर्मचारी आणि अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे.

या परिसरातील विजेच्या खांबावर फक्त एकच वीजवाहिनी असून त्याच तारेला क्षमतेपेक्षा जास्त आकडे जोडण्यात आल्याने वारंवार फ्यूज उडत आहेत. परिणामी दिवस-रात्र वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढले असून नागरिकांना अंधारातच दिवस काढावे लागत आहेतफ

गावात महावितरणचा केवळ एकच कर्मचारी कार्यरत असून तो बाहेरगावी राहत असल्याचा आरोप आहे. वीज गेल्यानंतर त्याला फोन केल्यास अनेकदा फोन उचलला जात नाही. फोन उचलल्यास नागरिकांना अरेरावीची भाषा ऐकावी लागत असल्याची तक्रार आहे. गावात उपस्थित असूनही मी बाहेर कामावर आहे असे सांगून जबाबदारी टाळली जात असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. सायंकाळी वीज गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजल्यानंतरच फ्यूज टाकून वीजपुरवठा सुरू केला जात असल्याने संपूर्ण रात्र ग्रामस्थांना अंधारात काढावी लागत आहे. पावसाळ्याच्या दिवसांत डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने लहान मुले, वयोवृद्ध, आजारी नागरिक आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या संदर्भात पाथर्डी येथील सहाय्यक अभियंता सांगळे यांच्याशी संपर्क साधला असता, वायरमनला सांगा असे उत्तर मिळत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिकाही प्रश्नचिन्हाखाली आली आहे.

महावितरणने तातडीने या भागातील अतिभारित वीजवाहिनी बदलून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, संबंधित कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अन्यथा ग्रामस्थांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आठ दिवसांपासून अंधार – जबाबदार कोण?

महावितरणकडे वारंवार तक्रारी करूनही समस्या कायम आहे. नागरिकांच्या संयमाचा अंत होत असून, आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः कोरडगावात येऊन पाहणी करून तातडीने उपाययोजहना करावी, अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



### चापडगावात लोकवर्गणीतून बसस्थानकाचे काम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** गेवराई राज्य मार्गावर असलेल्या चापडगाव येथील बसस्थानकाची गेली अनेक वर्षापासून दुरावस्था झाली असून या ठिकाणाहून दिवसभरात शेकडो प्रवाशी एस टी ने प्रवास करण्यासाठी तासनतास ताटकळत उभे राहत असून त्यातच सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अचानक आलेल्या पावसामुळे प्रवाश्यांना शेजारी कुठेच आसरा घेण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने व त्यातच या ठिकाणी स्व. आबासाहेब काकडे यांचे नावाने उच्च दर्जाचे कॉलेज असून या कॉलेजमध्ये पंचक्रोशीतील असंख्य विद्यार्थीही शिक्षण घेण्यासाठी एस टी बसने दररोज ये – जा करत असतात त्या विद्यार्थ्याचेही हाल होत असल्याने त्यांच्यासह प्रवासी वर्गासाठी निवारा असावा म्हणून गावातीलच काही होतकरू युवकांनी एकत्र येत एस टी महामंडळाकडून या ठिकाणी बसस्थानक होण्याची अपेक्षा दिसून येत नसल्याने किमान निवारा असावा म्हणून लोकवर्गणीतून बसस्थानक करण्याचा संकल्प करून तो पूर्ण करण्याचा निर्णय हाती घेतला असून हे काम तात्काळ पूर्ण कसे होईल या साठी अनेक तरुणांनी पुढाकार घेतला असल्याचे दिसून येत आहे.

### प्रभाग क्रमांक ४ मधील चारा, कचरा, उकिरडे कायमस्वरूपी बंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**डॉ. गीता नीरज लांडे यांच्या पुढाकाराने स्वच्छतेचा आदर्श**

**अमरापुर :** स्वच्छता ही केवळ आरोग्याची नव्हे, तर शहराच्या विकासाची, पर्यावरण संवर्धनाची आणि नागरिकांच्या जीवनमानाची गुरुकिल्ली आहे. हा विचार प्रत्यक्षात उतरवत शेवगाव शहरातील प्रभाग क्रमांक ४ मध्ये नगरसेविका डॉ. गीता नीरज लांडे यांच्या पुढाकाराने अनेक वर्षांपासून नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असलेले चारा, कचरा उकिरडे कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहेत.

या उपक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एक, काझी गल्लीच्या सुरुवातीचा एक तसेच प्रभागातील अन्य दोन ठिकाणांवरील कचरा उकिरडे हटवून त्या जागांची संपूर्ण स्वच्छता करण्यात आली. यामुळे परिसरातील दुर्गंधी, डास व माशांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांना स्वच्छ व निरोगी वातावरण उपलब्ध झाले आहे.

कचरा टाकण्याच्या जुन्या पद्धतीला आळा घालण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृतीही



करण्यात आली. घरातील कचरा घंटागाडीमध्येच टाकावा, सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत परिसर स्वच्छ ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

प्रभागातील स्वच्छतेचा हा उपक्रम इतर भागांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, नागरिकांनी लोकप्रतिनिधी व नगरपरिषद यांच्या सहकार्याने शहर अधिक स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.

### केडगावमध्ये दीड लाखाची घरफोडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** केडगावच्या सचिन नगर येथे एका बंद घराचा कडीकोंडा तोडून चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रकमेसह १ लाख ४१ हजार रुपयांचा ऐवज लांबवल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, अभिजीत सुधाकर काजळे ( रा. सचिन नगर, केडगाव, अहिल्यानगर) हे कुटुंबासह राहतात.

त्यांच्या आईवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याने कुटुंबातील सर्व सदस्य रात्री जेवण करून वरच्या मजल्यावर झोपण्यासाठी गेले होते. त्यापूर्वी त्यांनी खालच्या खोलीला आणि मुख्य गेटला कुलूप लावले होते. सकाळी आठ वाजेच्या सुमारास अभिजीत काजळे हे खाली आले असता, दरवाजाची कडी तुटलेली आणि कुलूप गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी आत जाऊन पाहिले असता घरातील कपाटातील साहित्य अस्तव्यस्त पडलेले दिसले. कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने, चांदीच्या वस्तू आणि रोख रक्कम चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले.

चोरीस गेलेल्या मालात १० ग्रॅमचा सोन्याचा नेकलेस, सोन्याच्या अंगठ्या, सोन्याचे डोरले, कर्णफुले, ३०० ग्रॅम चांदीचे दागिने आणि ७ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अभिजीत काजळे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार करत आहेत.



### लो. टिळक यांचे पुण्यस्मरण व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश खैरे, सुधीर आगळे, उपप्राचार्य नांगरे सर तसेच पर्यवेक्षक प्रा. मच्छिंद्र पानकर यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थिनी कु. भक्ती गर्जे हिने दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा प्रेरणादायी आढावा घेत आपल्या मनोगतातून त्यांचे विचार विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडले. तसेच विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक बापूसाहेब लोढे सर यांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रप्रेमाची आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहिते सर यांनी केले. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेवगाव बसस्थानकावरील शौचालये बंद

## प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अमरापूर :** शासनाच्या नव्या निर्णयानंतर एस.टी. महामंडळाच्या स्थानकावरील शौचालये बंद राहू लागल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच लांब पल्ल्याच्या प्रवाशांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कंत्राटी पद्धतीवर नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांनी शौचालयातील अस्वच्छता, दुर्गंधी आणि प्रतिकूल कामाच्या परिस्थितीमुळे साफसफाईचे काम करण्यास नकार दिला. त्यामुळे शौचालयांची नियमित स्वच्छता विस्कळीत झाली असून अनेक ठिकाणी शौचालये बंद ठेवण्याची




वेळ आली आहे.

यापूर्वी काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर बोलाविण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, संबंधित ठेकेदाराशी अद्याप अडीच वर्षांचा करार शिल्लक असल्याने हा प्रश्न प्रलंबित आहे. दरम्यान, प्रतिनिधीशी बोलताना संबंधित ठेकेदाराने सांगितले की, प्रवाशांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शौचालयांच्या देखभाल व स्वच्छतेसाठी किमान एक महिला आणि एक पुरुष असे दोन सेवाकर्मी नियुक्त करणे आवश्यक आहे. त्याशिवाय महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालयांची नियमित स्वच्छता राखणे आणि सेवा सुरळीत ठेवणे कठीण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बंद शौचालयांमुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून, स्थानक परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीची समस्या वाढत आहे. त्यामुळे एस.टी. महामंडळाने हा प्रश्न तातडीने सोडवून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, शौचालये नियमित सुरू ठेवावीत आणि स्वच्छतेची प्रभावी व्यवस्था करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडून पारनेरच्या राजकीय, सामाजिक कामांचा आढावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या अहिल्यानगर दौऱ्यादरम्यान पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांनी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड यांच्यासह त्यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील राजकीय, सामाजिक परिस्थिती तसेच विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

> या भेटीमुळे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, शासनाच्या सहकार्याने आ. दाते सरांचे नेतृत्वात मतदारसंघाच्या विकासाला नवसंजीवनी मिळेल. **प्रशांत गायकवाड**

यावेळी आ. काशिनाथ दाते यांनी मतदारसंघात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती, प्रलंबित प्रकल्प,



ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, शेतकरी हिताच्या योजना तसेच आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या विकासकामांचा सविस्तर आढावा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासमोर मांडला. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील राजकीय घडामोडी, सामाजिक वातावरण, संघटनात्मक स्थिती तसेच सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. नागरिकांच्या अपेक्षा, स्थानिक प्रश्न आणि विकासाला गती देण्यासाठी आवश्यक बाबी जाणून घेत त्यांनी मतदारसंघाच्या विकासासाठी राज्य शासनामार्फत आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

# वांबोरी चारी लाभधारक शेतकऱ्यांच्या आशा 'मुळा'च्या पाण्यावर !

## जलसंपदा मंत्री विखे यांच्याकडे आग्रही मागणी करणार : आ. कर्डिले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली आहे. मात्र दुसरीकडे वांबोरी चारी लाभधारक गावांमध्ये अत्यल्प पाऊस झाल्याने शेतकऱ्यांसमोर खरीप हंगामाबरोबरच आगामी रब्बी हंगामाचेही संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर वांबोरी चारी लाभधारक गावांसाठी मुळा धरणातून पाणी सोडावे यासाठी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे मागणी करणार असल्याची माहिती आ. अक्षय कर्डिले यांनी दिली.

खोसपुरी येथे आयोजित कार्यक्रमात आ.अक्षय कर्डिले बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, वांबोरी चारीच्या लाभक्षेत्रातील अनेक गावांमध्ये समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने तलाव, बंधारे आणि नाले कोरडे पडले आहेत. त्यामुळे शेतीसह पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न भविष्यात गंभीर होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मुळा धरणातील उपलब्ध पाण्याचा योग्य नियोजनबद्ध वापर करून



लाभधारक भागातील तलाव, बंधारे आणि नाले भरून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

मुळा धरणातून पाणी सोडल्यास केवळ खरीपातील उभ्या पिकांनाच नव्हे तर रब्बी हंगामालाही मोठा आधार मिळेल. विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीत वाढ होऊन संपूर्ण परिसरातील शेतीला नवसंजीवनी मिळेल. त्यामुळे या मागणीचा पाठपुरावा प्राधान्याने केला जाणार असल्याचे आ. कर्डिले यांनी स्पष्ट केले. शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या हिताचे निर्णय घेणे ही आपली जबाबदारी आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असून शेती, पाणी, वीज आणि इतर मूलभूत प्रश्नांवर शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल. तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठीही आपण सदैव कार्यरत राहू असे आश्वासन कर्डिले यांनी दिले. वांबोरी चारी लाभधारक शेतकऱ्यांच्या नजरा आता मुळा धरणातील पाण्याकडे लागल्या असून धरणातून पाणी सोडण्याच्या निर्णयामुळे हजारो एकर शेतीला मोठा दिलासा मिळेल अशी अपेक्षा लाभधारक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. आ.अक्षय कर्डिले यांच्या भूमिकेचे लाभधारक गावातील शेतकऱ्यांमधून कौतुक करण्यात येत आहे.

> आ. अक्षय कर्डिले यांना शेतकऱ्यांच्या समस्यांची पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे ते सदैव शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. वांबोरी चारीच्या पाण्याचा निर्णय हे त्याचेच द्योतक आहे. कर्डिले यांच्या निर्णयामुळे वांबोरी चारी लाभ धारक शेतकऱ्यांना निश्चित मोठा फायदा होणार आहे. **सोमनाथ हारेर**

## सीओईपीमधील वसतिगृहाची क्षमता वाढविण्याचा आराखडा सादर करा

**पुणे :** सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठाला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेशसंख्येत वाढ होत आहे. ही बाब लक्षात घेऊन वसतिगृहाची क्षमता वाढविण्यासाठी सविस्तर आराखडा तयार करून सादर करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. तसेच, नदी सुधार प्रकल्पाशी संबंधित महाविद्यालयाच्या परिसरातील कामे तातडीने सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**नदी सुधार प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करा – ना. चंद्रकांतदादा पाटील**

ना. पाटील यांनी आज सीओईपीमधील मुलींच्या व मुलांच्या वसतिगृहांची तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत येणाऱ्या बोट क्लब परिसराची पाहणी करून संबंधित कामांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी सीओईपीचे कुलगुरू डॉ. सुनील भिरुड, सीओईपी बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष विनायक पै, कुलसचिव डी. एन. सोनावणे, अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. पराग सदगिर, विद्यार्थी संघटनेचे माजी सदस्य जगदीश कदम, डॉ. राजेंद्र हिरेमठ, भरत गिते, विवेक पवार; तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे उपअभियंता उमेश शिद्रुक आदी उपस्थित होते.पाहणीदरम्यान कुलगुरू डॉ. भिरुड यांनी मुलींच्या वसतिगृहाची विद्यमान क्षमता ९००, तर मुलांच्या वसतिगृहाची क्षमता १,२०० असल्याची माहिती दिली. यावेळी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या नवव्या टप्प्यातील जमीन अधिग्रहणासंदर्भातील तांत्रिक अडचणींमुळे काम स्थगित असल्याची माहिती दिली. त्यावर महापालिका आयुक्तांशी चर्चा करून संबंधित अडचणी दूर करण्यात येतील, असे सांगत प्रकल्पाचे काम कोणताही विलंब न लावता तातडीने सुरू करण्याचे निर्देश ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

## खेड–आळंदी–चाकण भागातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी घेतली डॉ. गोऱ्हे यांची भेट

**पुणे :** खेड–आळंदी–चाकण परिसरातील विकासकामांना अधिक गती देण्यासाठी शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असून, स्थानिक गरजा लक्षात घेऊन विकासाचा सर्वंकष आराखडा तयार करण्यात येईल असे आश्वासन शिवसेना नेत्या व विधानपरिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी खेड–आळंदी–चाकण भागातील शिवसेना पदाधिकाऱ्यांना दिले.



खेड–आळंदी–चाकण भागातील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पुणे येथील सिल्व्हर रॉक्स या निवासस्थानी डॉ. गोऱ्हे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी या भागातील विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी काळात शासनाच्या अधिकाधिक योजना प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे मार्गदर्शन डॉ. गोऱ्हे यांनी केले.महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देत महिला शेतकरी ओळखपत्राचा अधिकाधिक लाभ मिळावा, महिला बचत गटांना शासकीय जमिनी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, तसेच बचत गटांच्या माध्यमातून स्थानिक महिलांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. याखेरीज, इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक त्या उपाययोजनांचा पाठपुरावा व चाकण औद्योगिक परिसरातील स्थानिक नागरिक आणि कामगारांना भेडसावणारे एमआयडीसीमधील विविध प्रश्न उद्योग विभागाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक प्रयत्न करण्यात येतील, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले.

# राखीव वनक्षेत्रात बेकायदा चराई वन विभागाची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील लोणी येथील राखीव वनक्षेत्रातील फॉरेस्ट कंपार्टमेंट क्र. २५८ मध्ये विनापरवाना शेळ्या व मेंढ्या चराई करत असल्याचे वन विभागाच्या गस्तीवेळी आढळून आले. याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत वनगुन्हा नोंद करण्यात आला आहे.

३१ जुलै २०२६ रोजी वन विभागाच्या नियमित गस्तीदरम्यान राखीव वनक्षेत्रात गुरे चराई सुरू असल्याचे निदर्शनास आले. तपासणी केली असता, लोणी (ता. आंबेगाव, जि. पुणे) येथील बिरा गणेश शिगटे यांनी कोणतीही वैध परवानगी न घेता राखीव वनक्षेत्रात प्रवेश करून शेळ्या व मेंढ्या चराई केल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २६(१)(अ) अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनास्थळाचा पंचनामा करून आवश्यक पुरावे संकलित



करण्यात आले असून, पुढील तपास वन विभागाकडून सुरू आहे.

ही कारवाई उपवनसंरक्षक, जुन्नर वन विभाग, प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक वनसंरक्षक, अमृत शिंदे यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली. कारवाईत वनपरिक्षेत्र अधिकारी, मंचर, विकास भोसले, वनपरिमंडळ अधिकारी, निलम चव्हाण, वनरक्षक लोणी, वनरक्षक धामणी तसेच ग्रामस्थ, पोलिस पाटील आणि सरपंच यांनी सहकार्य केले.

वन विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, राखीव वनक्षेत्रात विनापरवाना प्रवेश करणे किंवा गुरे चराई करणे हा दंडनीय गुन्हा आहे. वनसंपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी नागरिकांनी वन विभागाला सहकार्य करावे. तसेच राखीव वनक्षेत्रात अशा प्रकारे विनापरवाना प्रवेश किंवा चराई होत असल्याचे आढळल्यास तात्काळ वन विभागाला माहिती द्यावी.

## महाराष्ट्र ग्रामविकास परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी भाग्यश्री विवेक ठाकरे यांची नियुक्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** ग्रामगौरव फाउंडेशन या राज्यस्तरीय संस्थेशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र ग्रामविकास परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी भाग्यश्री विवेक ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण विकास क्षेत्रातील त्यांची कार्यतत्परता, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा निर्णय जाहीर करण्यात आला. परिषदेचे संस्थापक प्रणेते विवेक ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक कार्याध्यक्ष सुभाष मराठे यांनी भाग्यश्री ठाकरे यांच्या ग्रामीण विकास क्षेत्रातील अभ्यास, कार्याची आवड आणि संघटन कौशल्याचा गौरव करत त्यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली.



महाराष्ट्र ग्रामविकास परिषद ही राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद यांच्या समन्वयातून ग्रामीण विकासासाठी कार्यरत असलेली संघटना आहे. शासनाच्या विकासाभिमुख धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, शासन निर्णय, परिपत्रके आणि विविध कल्याणकारी योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविणे तसेच पंचायतराज व्यवस्थेतील सर्व घटकांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी परिषद सातत्याने कार्यरत आहे.

या पदाच्या माध्यमातून राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींशी संबंधित धोरणात्मक विषयांवर समन्वय साधणे, तसेच सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, पाणीपुरवठा कर्मचारी, संगणक परिचालक, रोजगार हमी योजनेचे रोजगार सहाय्यक आणि पंचायतराज व्यवस्थेतील सर्व घटकांच्या अडीअडचणी, प्रलंबित प्रश्न व रास्त मागण्यांसाठी संघटनात्मक पातळीवर प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

## साईडपट्टीवरील अतिक्रमण हटविण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**केडगाव :** दौंड तालुक्यातील टोलनाका ते दापोडी या रस्त्याच्या साईडपट्टीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, संबंधित अतिक्रमण तातडीने हटविण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

टोलनाका ते दापोडी रस्त्यावर विविध ठिकाणी साईडपट्टीवर गुरे बांधली जात आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे साठविण्यात आल्याने परिसर अस्वच्छ झाला आहे. महावितरण कंपनीच्या समोरील बाजूस तसेच त्यापुढे सुमारे पन्नास फूट अंतरावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या साईडपट्टीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्याची वाहतुकीसाठी उपलब्ध असलेली जागा कमी झाली आहे.

या ठिकाणी यापूर्वी किरकोळ अपघातांच्या घटना घडल्या आहेत. रस्ता इतर ठिकाणी तुलनेने रुंद असला, तरी या भागात साईडपट्टीवर अतिक्रमण



झाल्याने रस्ता अरुंद झाला आहे. एकाच वेळी विरुद्ध दिशेने दोन वाहने आल्यास एका वाहनाला थांबून दुसऱ्या वाहनाला मार्ग करून द्यावा लागतो. त्यामुळे या ठिकाणी अपघाताचा धोका वाढला आहे.रस्त्याच्या साईडपट्टीवरील अतिक्रमणामुळे भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता असून, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि दापोडी ग्रामपंचायतीने याची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. संबंधित विभागांनी पुढाकार घेऊन रस्त्याची साईडपट्टी अतिक्रमणमुक्त करून वाहतुकीसाठी जागा मोकळी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## महसूल समाधान शिबिरामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख होईल : सुनेत्रा पवार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व सम ाधान शिबिरामुळे महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिककेंद्रित होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. जानाई–शिरसाई योजनेतून बारामती तालुक्यातील सर्व जलसाठे व तलाव तातडीने भरण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सोमेश्वर येथील श्री शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, पंचायत समिती सभापती किरण तावरे, विविध पदाधिकारी, अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

पवार म्हणाल्या, शिबिराच्या माध्यमातून शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विविध विभागांशी संबंधित समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यात येत आहे. शेतजमीन, सातबारा, फेरफार, वारस नोंद आणि अकृषीक परवानगी यांसारख्या सेवांमध्ये पारदर्शकता व गती आणणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. शिबिरांमुळे प्रशासन नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचत असून, हीच लोकाभिमुख शासनव्यवस्था असल्याचे त्यांनी सांगितले. बारामती मतदारसंघात सुमारे १८ कोटी ८८ लाख रुपयांच्या निधीतून पाणंद रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यात आले असून, संमतीने आणखी शेतरस्ते तयार करण्यात येणार आहेत. महसूल विभागाने १० दिवसांचा कृती आराखडा राबवून शेतजमिनीचे पोटहिस्से, नकाशे व सातबारा अद्ययावत करण्यासह विविध योजनांचा लाभ नागरिकांना देण्याचे काम केले आहे. बारामतीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ३० खाटांचे क्रिटिकल केअर ब्लॉक मंजूर झाले आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याच्या सूचनाही पवार यांनी दिल्या.या शिबिरात ३० स्टॉलच्या माध्यमातून सुमारे २० हजार नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावेळी पवार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.फोटो ओळ : बारामतीतील महाराजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार. यावेळी उपस्थित मान्यवर.

## माय माऊली निघाली पंढरी' भावगीताचे आळंदीत प्रकाशन

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आळंदीतील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात रविवारी भक्तिमय वातावरणात 'माय माऊली निघाली पंढरी' या भावगीताचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. वारकरी, भाविक आणि म ान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.

या सोहळ्यास हभप नारायण महाराज जाधव, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, सुरेश वडगावकर, डि.डि.भोसले, सचिन गिलबिले, रामचंद्र भोसले, सोमनाथ कुऱ्हाडे, दिनेश घुले, सुरेश झोंबाडे, उज्वला काळे, संकेत वाघमारे, आनंद रणदिवे, उमेश बागडे आणि मान्यवर उपस्थित होते. भावगीताची संकल्पना व गीतलेखन आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केले असून, नागेश आडगावकर यांनी स्वर दिले आहेत. रोहन पंढरपूरकर यांचे संगीत संयोजन लाभले आहे.

# गुन्ह्यांच्या तपासासाठी सक्षम तपास कार्यप्रणालीची गरज

## सायबर गुन्हेगारी तपास यंत्रणेतील तज्ज्ञांचे मत

### ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज, डीओटी –एसएसपीयू यांचा संयुक्त उपक्रम; पुनीत बालन ग्रुपच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय तपास प्रशिक्षण कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** तंत्रज्ञान ज्याप्रमाणे बदलत आहे त्याप्रमाणे गुन्ह्यांची व्याप्ती आणि प्रकार बदलत आहेत. पारंपारिक पद्धतीने गुन्हे होण्याऐवजी आता घरबसल्या स्मार्टफोन वापरून फसवणुकीपासून ते देशाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होईल इतके गंभीर गुन्हे होत आहेत. त्यामध्ये केवळ साधन म्हणून स्मार्टफोनचा वापर केला जातो. अशावेळी जेव्हा गुन्हा करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो, तेव्हा गुन्ह्याचा तपास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान गरजेचे आहे. डिजिटल गुन्ह्यांच्या तपासासाठी सायबर साक्षरता ही गरजेची आहे, असे मत सायबर गुन्हेगारी तपास यंत्रणेतील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

ट्रान्सेंडेंटल टेक्नॉलॉजीज, तंत्रज्ञान विभाग – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्या संयुक्त विद्यमाने पुनीत बालन ग्रुपच्या सहकार्याने पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' सायबर सुरक्षा संदर्भातील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सायबर क्षेत्रातील गुन्हेगारी तपास यंत्रणांमधील तज्ज्ञांनी सायबर आणि डिजिटल गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी आवश्यक तंत्रांची माहिती दिली. ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीजचे प्रमुख डॉ. केतन अत्रे यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सोनल कामल म्हणाल्या, डिजिटल स्वरूपामध्ये गुन्हा घडल्यानंतर ज्या ठिकाणी गुन्हा घडला आहे, त्या ठिकाणी असणाऱ्या पुराव्यांम ध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड करता कामा नये. त्या ठिकाणी असलेल्या कॉम्प्युटर, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्हपासून ते विविध प्रकारच्या वायर, राउटर यांच्यापर्यंत विविध मशीन योग्य प्रकारे हस्तगत करणे गरजेचे आहे. ज्यावेळी कॉम्प्युटर जप्त करण्यात आला आहे, तो कॉम्प्युटर जसाच्या तसा तपासासाठी हस्तगत करणे गरजेचे आहे, त्यामध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड झाली तर तपास करताना अडथळे निर्माण होऊ शकतात.

युगल पाठक म्हणाले, गुन्ह्यांसाठी वापरण्यात आलेले मोबाईल फोन हस्तगत केल्यानंतर अली टूल , एडीबी , प्लॅटफॉर्म टूल अशा प्रकारच्या टूल्सचा वापर करून मोबाईल हिस्टरी जाणून घेता येते. मोबाईल हस्तगत केल्यानंतर तो पूर्णतः नेटवर्क फ्री करण्यासाठी तो ॲल्युमिनियम फाईलमध्ये गुंडाळला जाणे गरजेचे आहे, तरच तो मोबाईल कोणत्याही नेटवर्कमध्ये येऊ शकत नाही आणि त्यामध्ये पुन्हा छेडछाड करणे शक्य होणार नाही.

दिल्ली पोलिसांच्या क्राईम विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी डॉ. दृष्टी भूपतानी यांनी गुन्हेगारी घटनास्थळ तपासणी (उॲळाश डलशपश खर्पींशीींळसरींळेप) विषयावर अत्यंत प्रभावी व प्रात्यक्षिक सत्र घेतले. त्यांनी प्रत्यक्ष गुन्हेगारी घटनास्थळाची निर्मिती करून शस्त्रे व इतर पुरावे दाखवत पुरावे ओळखणे, संकलित करणे व जतन करण्याच्या शास्त्रीय पद्धतींचे मार्गदर्शन केले. हे सत्र सहभागींसाठी अत्यंत ज्ञानवर्धक व उत्स्फूर्त ठरले. सीमा सुरक्षा दल (BSF), गृह मंत्रालय (MHA) येथील सेकंड–इन–कमांड श्री. संजय शर्मा यांनी दहशतवादी वित्तपुरवठा (Counter Terror Financing) व मनी लॉन्डरिंग प्रतिबंध (Anti-Money Laundering) या विषयावर अत्यंत प्रभावी व संवादात्मक सत्र घेतले.

दहशतवादी संघटनांच्या आर्थिक जाळ्याची कार्यपद्धती, निधीचा मागोवा घेण्याच्या पद्धती आणि तपासातील महत्त्वाच्या बाबी त्यांनी उदाहरणांसह उलगडून सांगितल्या. हे सत्र सहभागींसाठी अत्यंत ज्ञानवर्धक, रंजक आणि प्रेरणादायी ठरले.संजय शर्मा यांनी टेररिस्ट फायनान्सिंग अँड मनी लॉन्ड्रीग, उदित शर्मा यांनी इन्वेस्टीगेटिंग सायबर क्राईम्स, फलिंदर डी एम यांनी इन्वेस्टीगेटिव्ह फिंगरप्रिंट अँड हॅन्ड रायटिंग डॉक्युमेंट्स या संदर्भात या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

## अंत्यसंस्कारावेळी आग्या मधमाशांचा हल्ला

### ग्रामस्थांना मृतदेह जागेवर ठेवून जीव वाचवण्यासाठी पळ काढावा लागला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** वडगावपीर ( ता. आंबेगाव ) येथील पोखरकर मळा क्रमांक १ व २ येथील स्म शानभूमीत ( दि.२ ऑगस्ट ) रोजी अंत्यसंस्कारासाठी जमलेल्या ग्रामस्थ व पाहुण्यांवर अचानक आग्या मधमाशांच्या मोहोळाने हल्ला चढवल्याने एकच गोंधळ उडाला. या अनपेक्षित घटनेमुळे काही काळासाठी मृतदेह जागेवरच ठेवून उपस्थितांना जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळ काढावा लागला.

जवंताबाई निवृत्ती पोखरकर यांच्या अंत्यसंस्काराची प्रक्रिया सुरू असतानाच स्मशानभूमी परिसरातील आग्या मधमाशांचे मोहोळ अचानक उठले आणि उपस्थितांवर तुटून पडले. मधमाशांच्या हल्ल्यामुळे स्मशानभूमीत भीतीचे वातावरण निर्माण झाले. नागरिक व पाहुण्यांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव केली.

या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अंकूश पोखरकर, खंडू पोखरकर, ज्ञानेश्वर पोखरकर, विजय पोखरकर, बाबूराव पोखरकर, म हादू पोखरकर, नवनाथ वाळूंज यांच्यासह इतर काही ग्रामस्थ व पाहुणे मधमाशांच्या दंशामुळे जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच माजी सरपंच संजय पोखरकर व माजी उपसरपंच अण्णा पोखरकर यांनी तातडीने धाव घेऊन जखमींना लोणी येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. उपचारानंतर सर्व जखमींची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

या घटनेनंतर स्मशानभूमी परिसरातील आग्या मधमाशांचे मोहोळ तातडीने हटविण्यात यावे, तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी संबंधित प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# नियमित कर्जफेड करणाऱ्यांनाही कर्जमाफी द्या : पोपटराव ताकवणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दौंड :** राज्य शासनाने अधिवेशनात जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या निर्णयावरून ग्रामीण भागात तीव्र आणि संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून, विशेषतः नियमित व वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शासनाने दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला असला, तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे 'प्रामाणिकांना शिक्षा आणि थकबाकीदारांना बक्षीस' अशी भावना निर्माण झाली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतची संपूर्ण कर्जमाफी देऊन समान न्याय द्यावा, अशी मागणी दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पोपटराव ताकवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

शासनाने शेतीपंपांचे साडेसात अश्वशक्तीपर्यंतचे वीजबिल माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच धर्तीवर २० अश्वशक्तीपर्यंतचे वीजबिलही माफ करावे, अशी मागणी ताकवणे यांनी केली आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांची संपूर्ण कर्जमाफी द्यावी आणि सध्या सहा तास



**आम्ही कर्ज फेडून चूक किंवा पाप केले का, कर्जमाफीच्या वेळी अटी–शर्ती शिथिल केल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला होता. मग सत्ताधारी आमदार नियमित कर्जदारांचे गाऱ्हाणे मुख्यमंत्र्यांकडे का घेऊन जात नाहीत. सत्ताधारी आमदारांनी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे निवेदन घेऊन त्यांचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर प्रसारित करुन एक जोरदार मोहीम राबवावी आणि २ लाखांपर्यंत दिलासा मागावा.**

**– पोपटराव ताकवणे,**
**दौंड कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक.**

मिळणारा विद्युत पुरवठा किमान आठ तास करावा, अशीही मागणी त्यांनी निवेदनात केली आहे. पारगाव व परिसरातील शेतकऱ्यांना नद्यांमधून शेतीसाठी पाणी उपसा करताना अधिक हेडचा सामना करावा लागतो. त्यामुळे कमी अश्वशक्तीचे पंप अपेक्षित क्षमतेने पाणी उपसा करू शकत नाहीत. परिणामी, तांत्रिकदृष्ट्या शेतकऱ्यांना अधिक अश्वशक्तीचे पंप बसवावे लागतात. त्यामुळे शासनाने २० अश्वशक्तीपर्यंतच्या शेतीपंपांचे वीजबिल माफ करण्याचा निर्णय घ्यावा, असे ताकवणे यांनी म्हटले आहे. कधी पिकांचे भाव कमी झाले, कधी दुष्काळ पडला, तर कधी अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान झाले, तरीही अनेक शेतकरी कर्ज थकविण्याचा पर्याय स्वीकारत नाहीत. बँकेचा हप्ता वेळेवर भरण्यासाठी काही शेतकरी आपल्या दावणीची जनावरे विकतात, दागिने तारण ठेवतात किंवा व्याजाने पैसे घेऊन कर्जाची परतफेड करतात. अशा प्रामाणिक आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन दिले जाते, तर थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळते. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांम ध्ये अन्यायाची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. सरकारला कर्जमाफी द्यायचीच असेल, तर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही तितकाच न्याय मिळाला पाहिजे. शासनाने या निर्णयाचा पुन्हा एकदा गांभीर्याने विचार करून आत्मपरीक्षण करावे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसह सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करावा, अशी मागणी पोपटराव ताकवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त रांजणगाव महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी :राष्ट्रसह्याद्री**

**शिरूर :** संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र रांजणगाव येथील श्री महागणपती मंदिरात रविवारी पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. पहाटे पाच वाजता श्रींचा अभिषेक करून मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. दिवसभर हजारो भाविकांनी श्रींचे दर्शन घेत संकष्टीचे व्रत पूर्ण केले.

संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले. दुपारी १२ वाजता देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा व महानैवेद्य संपन्न झाला. तसेच प्रगतशील शेतकरी. नानासाहेब पाचुंदकर पाटील यांच्या वतीने गाभाऱ्यात, तर देवस्थान ट्रस्टच्या वतीने संपूर्ण मंदिराची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली. श्री महागणपती भजनी मंडळ, रांजणगाव गणपती यांच्या भजनाने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.यावेळी गणेशभक्त भावेश कामदार यांच्या वतीने भाविकांसाठी केळीच्या म



हाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.भाविकांना सुरळीत व जलद दर्शन मिळावे यासाठी देवस्थान ट्रस्टने स्वतंत्र दर्शन रांग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच पावसाचा विचार करून मंडपाची सुविधा उपलब्ध करून दिली होती. या सुविधांमुळे भाविकांना कोणताही त्रास न होता दर्शन घेता आले, अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा. स्वातीताई दत्तात्रय पाचुंदकर पाटील यांनी दिली.यावेळी देवस्थानचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव, अध्यक्षा स्वाती पाचुंदकर पाटील, उपाध्यक्ष संदीप दौंडकर, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव, चेअरमन दत्ता पाचुंदकर पाटील, व्यवस्थापक बाळासाहेब गोऱ्हे, पांडुरंग चोरगे, हिशोबणीस संतोष रणपिसे, जनसंपर्क अधिकारी रमाकांत शेळके, देवस्थानचे कर्मचारी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.संकष्टी चतुर्थीनिमित्त रांजणगाव एम आयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## द • ख • ल

### भाजपा किसान मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी धोंडीभाऊ झावरे



**टाकळी ढोकेश्वर :** भाजपा किसान मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी टाकळी ढोकेश्वर येथील रोहिदास उर्फ धोंडीभाऊ झावरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब बलभिम कोळगे यांनी झावरे यांना नियुक्तीपत्र दिले आहे.या नियुक्तीपत्रात झावरे यांच्याकडून ते सर्वांना सोबत घेऊन दिलेली जबाबदारी पार पाडाल तसेच पक्षाच्या संघटन वाढीसाठी अथक परिश्रम कराल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. धोंडिभाऊ झावरे हे सामाजिक कार्यात नेहमीच अग्रभागी असतात तसेच विविध संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थी तसेच गरजू लोकांना नेहमीच मदत करत असतात. झावरे यांच्या निवडीबद्दल त्यांचे खाफ डॉ.सुजय विखे, बाळासाहेब बलभिम कोळगे, राहुल शिंदे, शिवाजी खिलारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### नवीन बांधकामाचे शटर तोडून ८७ हजाराची चोरी

**अहिल्यानगर :** नवीन बांधकामाधीन घराचे शटर तोडून चोरट्याने ८७ हजार रुपयांचे साहित्य चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फुलसौंदर मळा, भोसले आखाडा येथील एका नवीन घराच्या बांधकामाच्या ठिकाणी २९ जुलैच्या संध्याकाळी ६ वाजेपासून ते ३० जुलैच्या सकाळी १० वाजेच्या दरम्यान चोरट्याने घराच्या शटरचे कुलूप तोडून घरातील फेविकॉल चे डबे, ल्युमिनियमचे रोड, आणि फर्निचर साहित्य असा एकूण ८७ हजार रुपयांचा ऐवज पळवून नेला. याबाबत गजेंद्र रतन गिरी ( रा. नंदनवन कॉलनी, चाणक्य चौक, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. घटनास्थळाला पो. नि. नितीन देशमुख आणि सहा. पो. नि. कुणाल सपकाळे यांनी भेट दिली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार तोरडमल करत आहेत.

### लो. टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा. शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात लोकमान्य टिळक यांचे पुण्यस्मरण व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त विद्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदु पा भोसले होते या प्रसंगी मुख्याध्यापक इंगावले सर आणि नंदु पा भोसले यांच्या हस्ते लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविकात रणजित जाधव यांनी केले लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा आढावा घेऊन अभिवादन केले कु दिया रणदिवे, साक्षी विखे, दळवी यांनी मनोगत व्यक्त केले. राजू इंगावले यांनी सांगितले की, लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान नेते, स्वातंत्र्यसेनानी होते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. ही गर्जना करणारे प्रखर राष्ट्रभक्त होते स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे कार्य आणि योगदान मोलाचे आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून उपेक्षित आणि वंचित घटकांच्या वेदनाना प्रभावी वाचा फोडली समाजातील विषमतेविरुध्द लढण्याचे बळ त्यांनी आपल्या साहित्यातून दिले. श्रम करणारा माणूस हाच समाजाचा खरा निर्माता आहे हा विचार त्यांनी सांगितला त्यांनी शब्दातून समाजप्रबोधन आणि लेखणीतून परिवर्तनाची मशाल पेटवून वंचित, शोषित आणि कष्टकरी जनतेच्या वेदनांना वाचा फोडली. या महान क्रांतिकार लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा असे अहवान करुन अभिवादन केले. या प्रसंगी नंदू भोसले, जाधव रणजित, बर्डे भाऊसाहेब, व्यवहारे विकास, नन्नावरे, लिंभोरे राजाराम, अरगळे देविदास, लिंभोरे गोरख व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जाधव सरांनी केले व आभार व्यवहारे सरांनी व्यक्त केले.

### निकाळजे यांचा हातगावात जय मल्हार मंडळाकडून सत्कार



**हातगाव :** भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणीच्या सदस्यपदी रावसाहेब निकाळजे यांची निवड झाल्याबद्दल शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील जय मल्हार तरुण मंडळाकडून निकाळजे यांचा नुकताच सन्मान करण्यात आला आहे. हातगाव येथील खंडोबा मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार प्रसंगी निकाळजे यांनी म्हटले आहे की, माझ्यासारख्या एका मागासवर्गीय व्यक्तीला भारतीय जनता पक्षाने जिल्हा पातळीवर काम करण्यासाठी जी संधी प्राप्त करून दिली आहे. ती निश्चित स्वरूपाने सामाजिक व वयक्तिक रूपाने सर्वांच्या दृष्टीने हिताची कामे कशी करता येतील या साठी प्रयत्नवादी राहिल तसेच या भागातील विकासात्मक कामासाठी आ. मोनिका राजळे यांच्या माध्यमातून कटिबद्ध राहणार असल्याचेही असे निकाळजे यांनी सांगितले आहे. यावेळी संतोष गुंजाळ, बंडू घुले, एकनाथ सुसे, लहू गुंजाळ, विठू भिसे, भय्या काकडे, कृष्णा जऱ्हाड यांच्यासह मंडळाचे इतरही कार्यकर्ते उपस्थित होते.

### लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**नगर तालुका :** गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सुलोचना सप्तर्षी पूर्व प्राथमिक विभाग , वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा व प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या सर्व विभागांची उत्साह पूर्ण वातावरणात एकत्रितपणे गुरुपौर्णिमा व लोकमान्य टिळक पुण्यातिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. यावेळी रेखे, चंद्रशेखर कुलकर्णी, किरण वैकर उमेशजी रेखे, महेशजी रेखे, उदयकुमार भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी गुरूंचे समाज जीवनातील स्थान अधोरेखित करत प्रथम गुरू आई - वडील आणि शिक्षकांचे आदर, शिस्त आणि संस्काराचे महत्त्व पटवून दिले.पुस्तकातून फक्त माहिती मिळेल परंतु ज्ञान मिळवण्यासाठी गुरु हवेच असे मत त्यांनी मांडले.

# ढवळगावमध्ये भरदिवसा बिबट्याचे दर्शन

## ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट, वारंवार हल्ल्यांनंतरही उपाययोजना अपुऱ्या?

### वन विभागाने तातडीने पिंजरा लावण्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथे शनिवारी (दि. १ ऑगस्ट) भरदिवसा बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. श्रीमंत वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत पांढरी परिसरात शेतकरी शेताकडे जात असताना त्यांना बिबट्या दिसल्याची घटना घडली. दिवसा बिबट्याचा मुक्त संचार होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.ढवळगाव परिसरात बिबट्याचा वावर ही नवी बाब नसून, यापूर्वीही शेळ्यांवर हल्ले करून त्यांना ठार मारल्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच पाळीव कुत्रे, शेळ्या आणि इतर जनावरांवरही बिबट्याने वारंवार हल्ले केल्याने ग्रामस्थांमध्ये कायमच दहशतीचे वातावरण आहे.काही दिवसांपूर्वी बिबट्या आपल्या पिल्लांसह परिसरात फिरताना दिसल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली होती.

त्यामुळे या भागात बिबट्यांची संख्या वाढल्याची शक्यता व्यक्त केली जात असून शेतकरी, शेतमजूर आणि नागरिक शेतात जाताना अधिक सावधगिरी बाळगत आहेत.भरदिवसा बिबट्याचे दर्शन झाल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबतही गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.



अनेक शेतकरी जीव मुठीत धरून शेतीची कामे करत असल्याचे चित्र असून, सायंकाळनंतर अनेकजण शेतात जाणे टाळत आहेत.ग्रामस्थांनी वन विभागाकडे या परिसरात तातडीने पिंजरा लावण्याची, नियमित गस्त वाढविण्याची आणि नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्याची मागणी केली आहे. कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी बिबट्याचा बंदोबस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी एकमुखी मागणी होत आहे.

### डॉ.डी.टी शाह व पार्थ वेल्फेअर फाउंडेशनच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी पाणी फिल्टर, गणवेश वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** समाज विकास संस्थेचे,हशु आडवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राशीन येथे डॉ.डी.टी शाह आणि पार्थ वेल्फेअर फाउंडेशन यांच्यावतीने स्व. सुरेखा दिलीप शहा यांच्या स्मरणार्थ हशु आडवाणी विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी पाणी फिल्टर मशीन आणि गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमात अल्लाउद्दीन एस काझी होते. यावेळी डॉ. डी. टी शहा, शांताराम पडवळकर, संतोष लड्ढे, शाह मॅडम, आस्मा काझी, विद्यार्थ्यांची गरज ओळखून विद्यार्थ्यांसाठी मदतीची आवाहन करण्यासाठी विद्यालयाचे शिंदे आजिनाथ यांच्या विशेष पाठपुराव्याने कर्तुत्वान व्यक्तींच्या दातृत्वातून हा कार्यक्रम घडून आला. आणि विद्यालयातील विद्यार्थ्यांची पिण्याच्या शुद्ध पाण्याची कमतरता या माध्यमातून दूर झाली. तर त्यांच्या वतीने अकरावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी कु.रिया शिंदे हिने अनमोल सहकार्याबद्दल मान्यवरांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रम प्रसंगी जगद्गुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन २०२६ च्या निमित्ताने राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार श्री.राजेंद्र नष्टे सर यांना प्राप्त झाल्याबद्दल

मान्यवरांच्या उपस्थितीत प्रा. राजेंद्र नष्टे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये पार्थ फाउंडेशनचे उपाध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी दशेत आपल्या आयुष्यात आलेल्या अनुभवांच्या आधारे गरजू विद्यार्थ्यांसाठी मदत करत असल्याची भावना व्यक्त केली. आयुष्यात कुठल्याही कामाचा कमीपणा न बाळगता कष्ट करत राहण्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाची अध्यक्ष निवड सागर नष्टे यांनी केले तर दिगांबर साळवे यांनी दिले.

### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**नगर तालुका :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त साहित्यरत्नलोकशाहीरअण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) जिल्हा कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित जयंती उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली यावेळी मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती धनादेश देऊन गौरव करण्यात आला. तसेच महामंडळाच्या विविध योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी लोकाभिमुख प्रशासनाची संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा व्यवस्थापक लक्ष्मण कांबळे यांनी दिली. कार्यक्रमाची सुरुवात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अग्रणी बँकेचे रितेश वाकोडे उपस्थित होते. यावेळी विविध मान्यवर, अधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात जिल्हा व्यवस्थापक लक्ष्मण कांबळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, समाजकार्य आणि संघर्षमय जीवनाचा आढावा घेत त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली. ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नव्हे, तर कष्टकरी आणि श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे.



### चिचोंडी येथील आनंद विद्यालयात पालक मेळावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी :** आजचे युगहे अत्यंत स्पर्धेचे आहे अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी यश मिळवण्याचे असेल तर जिद्द शिस्तसंस्कार सातत्यपूर्ण परिसरामाची साथ कधीही सोडू नये ध्येय निश्चित करून प्रामाणिकपणे मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतीही स्पर्धा कठीण नसते निरोगी शरीर सकस आहार आणि नियमित अभ्यास या त्रिसूत्रीच्या बळावरच यशाचे शिखर गाठता येते असे प्रतिपादन आनंद विद्यालयाचे प्राचार्य शिंदे एस,टी यांनी केले.

या कार्यक्रमासाठी चिचोंडी चेउपसरपंच आबा गरुड ग्रामपंचायत सदस्य संदीप दानवे पिनू भिंगारदिवे अनिल गर्जे भाऊसाहेब डमाळे तसेचशिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महिला पालक उपस्थित होते.

यावेळी डॉक्टर पालवे म्हणाले की विद्यार्थ्यांनी शाळेच्या वेळेत मोबाईल शाळेत आणू नये जर विद्यार्थ्यांनी मोबाईल शाळेत आणला तर तो जप्त करावा व पालका देखतच तो परत देण्यात यावा अशी श सक्त ताकीददेण्यात आली,गणित विज्ञान इंग्रजी या विषयाचे जास्त तास घेण्यात यावे अशी सूचना त्यांनी केली. गरड सर यांनी सांगितले की दररोज पालकांनी आपल्या मुलांनाविचारले पाहिजे की आज शाळेत काय शिकवले तू अभ्यास केला का यासाठी मुलाशी संवाद केला पाहिजे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवा ळीसर यांनी केले तसेच सूत्रसंचालन डॉक्टर तांबे यांनी केले. उपस्थित सर्व पालकांचे,महिला चे,सागर गुंदेचा यांनी आभार मानले.

### ढाकणे शैक्षणिक संकुलात 'सिव्हिल अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी' विषयावर व्याख्यान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती व गुरुपौर्णिमेनिमित्त पालखी मिरवणूक, महापूजा, आरती आणि सिव्हिल अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी या विषयावरील विशेष व्याख्यानाचा कार्यक्रम अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ढाकणे शैक्षणिक संकुलाचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण डॉ. एकनाथराव ढाकणे हे होते. यावेळी बबनराव बडे, डॉ. खेडकर, विष्णू आंधळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुनील औताडे यांनी केले.

या कार्यक्रमास प्रा. आर. एच. अत्तार, प्रा. महेश मरकड, प्रा. प्रवीण नागरगोजे, प्रा. संतोष आंधळे यांच्यासह संस्थेचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संतांची भूमी की अवैध धंद्यांचे माहेरघर?

## श्रीगोंद्यात गुटखा, दारू, गांजा, मटका व अमली पदार्थांचा विळखा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** संतांची भूमी म्हणून ओळख असलेल्या श्रीगोंदा शहर आणि तालुक्याची प्रतिमा आता अवैध धंद्यांमुळे मलिन होत असल्याची तीव्र भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. बंदी असतानाही गुटख्याची खुलेआम विक्री, गावोगावी देशी-विदेशी दारूची सहज उपलब्धता, गांजाचा वाढता वापर, मटका व्यवसाय पुन्हा सुरू झाल्याची चर्चा आणि अधूनमधून अमली पदार्थांचा शिरकाव होत असल्याच्या आरोपांमुळे कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कागदोपत्री गुटखा बंद असला तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी त्याची सहज विक्री होत असल्याचा आरोप आहे. त्याचबरोबर मटका व्यवसायही पुन्हा डोके वर काढत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या कारवाईची प्रभावीता आणि सातत्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे या अवैध धंद्यांचा विळखा आता तरुण पिढीपर्यंत पोहोचत असल्याचे चित्र आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील युवक व्यसनांच्या आहारी जात असल्याची खंत पालक व्यक्त करत आहेत. तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेली लेकरं नशेच्या विळख्यात अडकत आहेत, अशी भावना अनेक पालकांनी व्यक्त केली आहे.

ग्रामीण भागात गाव तिथे दारू अशी परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप होत असून, व्यसनाधीनतेमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सामाजिक संघटनांनीही व्यसनमुक्तीसोबतच अवैध धंद्यांविरोधात व्यापक आणि कठोर मोहिम राबविण्याची मागणी केली आहे.नागरिकांचे म्हणणे आहे की, केवळ अधूनमधून होणाऱ्या कारवाया पुरेशा नाहीत. अवैध धंद्यांच्या मूळ सूत्रधारांवर कठोर कारवाई करून सातत्यपूर्ण धडक मोहीम राबविणे गरजेचे आहे. अन्यथा व्यसनाच्या गर्तेत अडकणाऱ्या तरुणाईचे भविष्य अंधारमय होईल आणि त्याची मोठी सामाजिक किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागेल.

### राज्य पत्रकार संघाच्या विभागीय अध्यक्षपदी दत्ता गाडगे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्षपदी पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील पत्रकार दत्ता गाडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि अहिल्यानगर या पाच जिल्ह्यांतील संघटनात्मक कामकाजाची धुरा आता त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तसेच,अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी नविन जिल्हाध्यक्ष निवड जाहीर होईपर्यंत त्यांच्याकडेच कायम राहील. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश संघटक संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

जिल्हाध्यक्ष, जिल्हा सचिव तसेच सलग तीन वेळा पारनेर तालुका अध्यक्ष म्हणून काम करताना दत्ता गाडगे यांनी पत्रकार संघटना बळकट करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले. पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष, संवादयात्रेचे यशस्वी आयोजन, कोरोना काळातील धाडसी पत्रकारिता, पत्रकार कल्याणासाठी विविध उपक्रम आणि सामाजिक बांधिलकीच्या कार्यामुळे त्यांना राज्यभरात विशेष ओळख मिळाली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत यापूर्वी त्यांना उत्कृष्ट अध्यक्ष आणि उत्कृष्ट संघटक या राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या निवडीबद्दल समाजसेवक अण्णासाहेब हजारे, ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील,माजी मंत्री आ.दिलीपराव वळसे, मा.मंत्री बाळासाहेब थोरात, पद्मश्री पोपटराव पवार, खा. निलेश लंके, खा. डॉ.अमोल कोल्हे, खा. सुजय पाटील, आ. काशिनाथ दातेसर, आ. शरद सोनवणे, आ. सत्यजित तांबे, सत्यशील शेरकर, अशोकराव सावंत, गंगाराम बेलकर आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# पारनेरमध्ये निर्भया पथक स्थापन करा

## सुषमा रावडेंचा विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षेवर भर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांनी विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पारनेर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र निर्भया पथक स्थापन करून ते प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर केले.

महिला सक्षमीकरण, सामाजिक प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा आणि महिलांच्या हक्कांसाठी सक्रियपणे काम करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांनी ही मागणी पुढे आणली आहे. तालुक्यातील विद्यार्थिनी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनात पारनेर पोलीस स्टेशन अंतर्गत निर्भया पथकाची तातडीने स्थापना करून त्याचे नियमित गस्त व जनसंपर्क उपक्रम राबविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तालुक्यातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यालये, बसस्थानके आणि गर्दीच्या परिसरांमध्ये निर्भया पथकाची माहिती,



संपर्क क्रमांक आणि कार्यपद्धती दर्शविणारे माहितीफलक व बॅनर्स लावण्यात यावेत, असेही नमूद करण्यात आले आहे.

महिलांमध्ये आणि विद्यार्थिनींमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी माहितीपत्रकांचे वितरण करण्यात यावे, तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये महिला सुरक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर कार्यक्रम, जनसंवाद उपक्रम, प्रबोधनपर सत्रे आणि कायदेशीर हक्कांविषयी जनजागृती मोहीम राबविण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

याशिवाय फेसबुक, व्हॉट्सअप, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल मीडिया माध्यमांद्वारे निर्भया पथकाची माहिती, संपर्क क्रमांक आणि नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सेवांचा सातत्याने प्रचार-प्रसार करण्यात यावा, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळू शकेल, असेही रावडे यांनी म्हटले आहे.

निवेदन सादर करताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, महिला शहराध्यक्षा कविता औटी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होत्या. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

> सध्या विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. महिलांना निर्भयपणे शिक्षण, नोकरी आणि दैनंदिन व्यवहार करता यावेत यासाठी प्रभावी सुरक्षा यंत्रणा आवश्यक आहे. पारनेर तालुक्यात निर्भया पथकाची स्थापना झाल्यास महिलांना तातडीची मदत मिळेल, तसेच छेडछाड, अत्याचार आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यास मदत होईल. पोलीस प्रशासनाने या मागणीची सकारात्मक दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी आमची अपेक्षा आहे.
>
> **सुषमा रावडे**

दैनिक राष्ट्र सह्याद्री
सोमवार दि .०३ ऑगस्ट २०२६


## नान्नज शिवारात कत्तलीसाठी डांबलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर कत्तल व वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने जामखेड तालुक्यातील नान्नज शिवारात धडक कारवाई करत कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका केली. या कारवाईत ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शनिवारी (दि. १) जामखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, नान्नज येथील हजारे यांच्या वीटभट्टीसमोरील मोकळ्या जागेत गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचासमक्ष छापा टाकला असता, उघड्यावर तीन गोवंशीय जनावरे आढळून आली.

चौकशीत ही जनावरे समीर कुरेशी (रा. नान्नज) याची असल्याचे निष्पन्न झाले. जनावरांना चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता क्रूरपणे डांबून ठेवल्याचेही उघड झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे ८० हजार रुपये किमतीची गोवंशीय जनावरे ताब्यात घेतली. दरम्यान, कारवाईची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाला.

याप्रकरणी पोलीस अंमलदार रोहित मधुकर मिसाळ यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम व प्राण्यांवरील क्रूरतेस प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीचा शोध सुरू आहे.

## भेंडाळा फाटा येथील भीषण अपघातात आयशर चालकाचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर अहिल्यानगर महामार्गावरील भेंडाळा फाटा येथे एका हॉटेल समोर रविवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात आयशर चालकाचा जागीच मृत्यू झाला. टायर फुटल्याने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून भरधाव आलेल्या आयशरने जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रकचा टायर फुटल्याने चालकाने वाहन हॉटेल ५१५१ समोर रस्त्याच्या कडेला उभे केले होते. त्याचवेळी मागून येणाऱ्या आयशर चालकाला उभ्या ट्रकचा अंदाज न आल्याने

आयशर थेट ट्रकच्या मागील बाजूस धडकली. धडक इतकी भीषण होती की आयशरचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला आणि चालक अडकून पडला. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली. चालकाला बाहेर काढण्यासाठी क्रेनची मदत घेण्यात आली. जवळपास दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर चालकाला वाहनातून बाहेर काढण्यात यश ाले.
टनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक अनिल झोरे, रुग्णवाहिका चालक शुभम वाघमारे तसेच क्रेन चालक अरुण सावंत यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. गंभीर जखमी चालकाला गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित

केले. मृत चालकाचे नाव गणी अब्बास शेख (वय २५, रा. बोलेगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे असून, तो एमएच-१४ एलएल ६९२३ क्रमांकाच्या कंटेनरचा चालक असल्याची

माहिती आहे. या प्रकरणाची नोंद गंगापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

# पाकिस्तानी 'गोरी' क्रीमचं संगमनेर कनेक्शन

## गोल्डन मार्केटवर एफडीएचा छापा; दुकानदार ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** सीमेपलीकडील पाकिस्तानात तयार होणारी व मानवी आरोग्यास घातक मानली जाणारी 'गोरी ब्युटी क्रीम' आणि 'गोरी डे अँड नाईट क्रीम' थेट संगमनेरच्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने संगमनेर शहर पोलिसांच्या मदतीने शनिवारी (१ ऑगस्ट) दुपारी गोल्डन मार्केटमधील दुकानावर धाड टाकत १२ हजार ९०० रुपयांचा पाकिस्तानी सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त केला. या प्रकरणी संबंधित दुकानदाराला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध विविध कलमांखाली संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औषध निरीक्षक सोमनाथ मुळे (अहिल्यानगर) यांच्या फिर्यादीनुसार शाहीद रियाज शेख (वय ३६, संगमनेर) यांच्या दुकानावर छापा टाकण्यात आला. तपासणी दरम्यान पाकिस्तान इन पाकिस्तान पाकिस्तान स्टँडर्ड असा उल्लेख असलेल्या 'गोरी ब्युटी क्रीम' व 'गोरी डे अँड नाईट क्रीम' चा मोठा साठा आढळून आला. यामध्ये ७,७०० रुपये, २,२०० रुपये आणि २,२०० रुपये किमतीचे विविध बॉक्स जप्त करण्यात आले. हिंदुस्थानात विक्रीसाठी आवश्यक परवानगी नसतानाही ही उत्पादने ग्राहकांना विक्रीसाठी ठेवल्याचे तपासात निष्पन्न झाले असून या कारवाईने शहरात खळबळ उडाली आहे.






# संचालक अर्चना कुटेसह दोघींना अटक

## ज्ञानराधा मल्टिस्टेट घोटाळा प्रकरण तीन दिवसांची पोलीस कोठडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** बीड येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या संचालक अर्चना कुटे (रा. हिरालाल पेठ, बीड) व आशा पाटोदेकर (रा. सोलापूर) या दोघींना नगरच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांना श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. दरम्यान, त्यांना श्रीरामपूर येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता त्यांना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

श्रीरामपूर येथील ठेवीदारांचे पैसे ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये अडकले असून या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात २९ जुलै २०२४ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. तसेच जामखेड मधील ठेवीदारांचेही पैसे अडकले असून १९ जणांविरूध्द जामखेड पोलीस ठाण्यात ७ ऑगस्ट २०२४ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. हे दोन्ही गुन्हे तपासकामी येथील आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहेत. दोन्ही गुन्ह्यांचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे. यापूर्वी चेअरमन सुरेश कुटेसह चौघांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना अटक केली होती. दरम्यान, संचालक अर्चना कुटे व आशा पाटोदेकर या दोघांना बीड पोलिसांनी अटक केली होती. त्या दोघी बीड पोलिसांच्या ताब्यात होत्या.

न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून अहिल्यानगर आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्या दोघींना बीड पोलिसांच्या ताब्यातून घेतले आहे. त्यांना सध्या श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. बीड येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट मध्ये बीड, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर येथील ठेवीदारांच्या सुमारे चार हजार कोटींच्या ठेवी अडकल्या आहेत. या मल्टिस्टेटचा चेअरमन सुरेश कुटे याच्यासह संचालक मंडळाविरूध्द बीड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात फसवणूकीचे गुन्हे दाखल झाले आहेत. दरम्यान, त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड व श्रीरामपूर येथील ठेवीदारांच्या ठेवी दिल्या नसल्याने त्यांच्याविरूध्द गुन्हे दाखल झाले आहेत. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात चेअरमन कुटेसह १५ जणांविरूध्द तर जामखेड पोलीस ठाण्यात चेअरमन कुटेसह १९ जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खऱ्या नोटांच्या बदल्यात बनावट नोटा देणारी टोळी जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** खऱ्या नोटांच्या बदल्यात चौपट बनावट नोटा देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा संगमनेर शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. शहरातील जनता नगर परिसरात सापळा रचून पोलिसांनी चार जणांना अटक केली असून त्यांच्याकडून १२ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दोन लाख रुपयांच्या खऱ्या नोटांच्या बदल्यात आठ लाख रुपयांच्या बनावट नोटा देण्याचे आमिष दाखवत होते. बनावट नोटांच्या बंडलमध्ये वर आणि खाली खऱ्या नोटा ठेवून मधोमध 'चिल्ड्रन बँक ऑफ इंडिया' असे छापलेल्या खेळण्यातील नोटा भरून नागरिकांची फसवणूक केली जात होती. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सागर नागरे यांच्या फिर्यादीवरून मयुर किशोर सिद्धपुरा (वय ३८, रा. खामगाव), उमेश कांबळे (रा. खामगाव), संदीप धडमवार (रा. नाशिक) आणि गोलू उर्फ शंकर गिरी (रा. शेगाव) या चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी १ लाख ८५ हजार रुपयांची रोख रक्कम, १४ लाख रुपये दर्शनी मूल्याचे बनावट नोटांचे बंडल, सुमारे १० लाख रुपये किमतीची टाटा नेक्सॉन (एमएच ५६ ए ४४२३) कार, तीन मोबाईल फोन तसेच इतर साहित्य असा एकूण १२ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत करीत आहेत.

# संगमनेर येथे 'गांजा विक्रेत्यांवर' एलसीबीचा छापा, तिघे गजाआड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** अहिल्यानगर जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेने तालुक्यातील संगमनेर शहरामध्ये मोठी कारवाई करत गांजा विक्री करणाऱ्या तिघांना अटक केली. या कारवाईत २ लाख ३४ हजार २५० रुपयांचा गांजा, दुचाकी, मोबाईल व इतर साहित्य जप्त करण्यात आले असून आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार अंमली पदार्थविरोधी टास्क फोर्सचे नोडल अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक संगमनेर शहरात माहिती संकलन करत होते.यावेळी



गुप्त बातमीदाराकडून 'जनता नगर' परिसरात एका घरातून गांजाच्या पुड्या तयार करून विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली.ही माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखा आणि संगमनेर शहर पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने जनता नगर येथे छापा टाकला.

कारवाई दरम्यान संजय उर्फ संदिप राजू मालुंजकर (वय २६), आकाश विजय क्षीरसागर (वय २९) आणि प्रविण सखाराम पाचकर (वय २८) या तिघांना ताब्यात घेण्यात आले.

आरोपीच्या घराची तसेच त्यांच्या ताब्यातील टीव्हीएस ज्युपिटर दुचाकीची झडती घेतली असता, ४.१३० किलो गांजा, टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी, मोबाईल फोन तसेच गांजाच्या पुड्या तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, चिकट टेप, स्टेपलर व पिना असा एकूण २,३४,२५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्रमांक ७३६/२०२६ अन्वये गुंगीकारक औषधिद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) कायदा, १९८५ अंतर्गत कलम ८ (क) व २० (ब) (ळळ) (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

अंमली पदार्थांची विक्री व तस्करी रोखण्यासाठी अशाच प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिली.

# तुकाराम मुंडेंच्या धसक्याने शिवाजी विद्यालयातील शालेय पोषण आहार चकाचक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** शालेय पोषण आहार हा विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट जोडलेला आहे. म्हणूनच अन्न व औषध प्रशासन एफडीए आणि शिक्षण विभाग वेळोवेळी तपासणी करतात.नुकत्याच अन्न व औषध प्रशासनाचे प्रधान सचिव तुकाराम मुंडेंच्या शाळांना भेटी देऊन शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत कडक सूचना दिल्या होत्या त्यांच्या ''धसक्याने'' कडक कारवाईच्या भीतीने प्रशासन आणि शाळा व्यवस्थापनाने तातडीने हालचाली केल्या असून छत्रपती शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथील शालेय पोषण आहाराची ठिकाण स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे.

> आ.आशुतोष काळे यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यालयातील शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोज स्वयंपाक घर,स्वच्छ, शुद्ध पोषण आहार, शुध्द पाणी मिळण्यासाठी तसेच शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाचे नियमांचे पालन करण्यासाठी शिक्षक व बचत गटाचे सदस्य सतत प्रयत्नशिल असतात
>
> **प्रकाश चौरे**
> **मुख्याध्यापक, शिवाजी विद्यालय सुरेगाव**

कोपरगाव तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या संकुलातील छत्रपती शिवाजी विद्यालय, राधाबाई काळे कन्या विद्यालय व छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय असून येथील सर्व शाळांनी तातडीने स्वच्छता मोहीम स्वयंपाकघर, भांडी, साठवणूक जागा यांची पूर्ण स्वच्छता करण्यात आली. कीटकनाशक फवारणी आणि जुन्या तांदूळ/डाळींची तपासणी करण्यात आली शिक्षक आणि शिजवणाऱ्या बचत गटातील महिलांना स्वच्छतेचे आणि हात धुण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.पिण्याचे पाणी शुध्द ठेवण्यात आले.शासनाचे नवीन नियम प्रत्येक शाळेत वर्षातून किमान २ तपासण्या, आणि क्रन्ड्ड पदार्थांवर बंदी नवीन मेनू २०२४-२५ पासून १५ प्रकारचे पौष्टिक पदार्थ दिले जात आहेत जसे व्हेज पुलाव, नाचणी सत्व, सोयाबीन पुलाव देऊन शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.



# कोपरगावात गुटखा माफिया व जुगार अड्ड्यांवर एकाचवेळी धडक

## ११ आरोपींविरुद्ध पाच गुन्हे, २.१४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव, :** कोपरगाव शहर व तालुक्यात अवैध गुटखा विक्री आणि जुगार व्यवसायाविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने शुक्रवारी मोठी संयुक्त कारवाई करत गुटखा विक्रेते आणि जुगार अड्ड्यांवर एकाचवेळी धाड टाकली. या विशेष मोहिमेत ११ आरोपींविरुद्ध पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून २ लाख १४ हजार ७७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, एका कारवाईतच तब्बल १ लाख ४० हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा हस्तगत झाल्याने परिसरात अवैध गुटखा विक्रीचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली होती. पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, विजय ठोंबरे, अभिजीत अरकल, अशोक लिपणे, रणजीत जाधव आणि अमृत आढाव यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे १ ऑगस्ट रोजी शहर व तालुक्यात एकाचवेळी धाडसत्र राबवले.

कारवाईदरम्यान विविध ठिकाणी सुरू असलेल्या अवैध गुटखा विक्रीवर मोठा आघात करण्यात आला. एका ठिकाणी १ लाख ४० हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. त्यानंतर भोजडे परिसरात छापा टाकून ३६ हजार २४० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. या प्रकरणी अभिजीत रविंद्र ठाकरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच कोळपेवाडी येथे १४ हजार १३२ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला असून अरिफ रज्जाक पठाण याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा साथीदार अर्जुन सोनी हा फरार असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.

गुटखा विक्रीसोबतच शिंगणापूर व लक्ष्मीनगर परिसरातील जुगार अड्ड्यांवरही धडक कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये अनेक आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून रोख रक्कम, पत्ते व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणातील एक आरोपी अद्याप फरार असून त्याचाही शोध सुरू आहे.

या कारवाईत गुटखा विक्रीप्रकरणी अभिजीत रविंद्र ठाकरे, नदीम सलीम शेख, अल्ताफ अलीम मनियार, अरिफ रज्जाक पठाण यांच्यासह इतरांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर जुगार अड्ड्यांवरील कारवाईत गणेश गर्जे, विनोद आहिरे, प्रसाद पेंढारे, सोमनाथ महाजन आणि रविंद्र तेलोरे यांच्यावर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे नोंदविण्यात आले. चंद्रकांत जाधव व अर्जुन सोनी हे दोन आरोपी फरार असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेच्या या धडक कारवाईमुळे कोपरगाव शहर व तालुक्यातील अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून अवैध गुटखा विक्री, जुगार व इतर बेकायदेशीर व्यवसायांविरोधातील कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

